प्रकरण ४ थे

# ‘अर्थ आणि अन्वयार्थ’ ग्रंथाचा सामाजिक व वाङ्मयीनदृष्ट्या विचार

# प्रकरण ४ थे

# 'अर्थ आणि अन्वयार्थ' ग्रंथाचा सामाजिक व वाङ्मयीनदृष्ट्या विचार

## प्रस्तावना

अनेक नामवंत लेखकांनी स्तंभलेखन केलेले आहे त्याचप्रमाणे या स्तंभलेखनाला मोठा वाचकवर्ग लाभल्यामुळे हा रचनाप्रकार फार मोठ्या प्रमाणात प्रसिद्धीस पावलेला आहे. याचे कारण म्हणजे या स्तंभलेखन रचनाप्रकाराला दीडशे वर्षांची परंपरा लाभलेली आहे. म्हणूनच याचा सामाजिक आणि वाङ्मयीनदृष्ट्या विचार महत्त्वाचा वाटतो. वाङ्मय प्रकारामध्ये निबंध, कथा, कादंबरी, काव्य, नाटक, ललित लेख इत्यादी विविध रचनाप्रकार येतात. यामध्ये हे लेखन केलेले असते. त्याप्रमाणेच स्तंभलेख हेही ललित शैलीने केलेले असते. यादृष्टीने गंगाधर पानतावणे यांचा 'अर्थ आणि अन्वयार्थ' हा ग्रंथसुद्धा प्रभावी असा आहे.

गंगाधर पानतावणे यांनी 'अर्थ आणि अन्वयार्थ' या ग्रंथामध्ये सामाजिक, राजकीय, धार्मिक, स्त्रीविषयक, बालविवाह , चित्रपट, वाङ्मयीन, शेतीविषयक, क्रीडा या सर्व क्षेत्रामध्ये विविध घटना घडत असतात. यातील काही घटनांचा परामर्श घेतला आहे. या विविध विषयावरील जे स्तंभलेखन केले आहे. त्यामध्ये समाजामध्ये घडणाऱ्या घटनांची वैचारिक बाजू मांडलेली आहे. ती खरोखरच लक्षात येण्यासारखी आहे. गंगाधर पानतावणे यांच्या स्तंभलेखनातील व्यक्तिचित्रण, प्रसंग, भाषाशैली आणि संवादशैली अंतर्मुख करणारी आहे. स्तंभलेखनामध्ये समाजमनाचा विचार करणे फार महत्त्वाचे असते. कारण स्तंभातून दंभाचा स्फोट घडला की समाज स्तंभित होतो हे विचारात घेऊन गंगाधर पानतावणे यांनी अक्षरांचा, शब्दांचा, संवादाचा आणि भाषेचा वापर केला आहे. त्यातुनच त्यांनी अनेक लोकांना आपल्या स्तंभलेखनातून अंतर्मुख करण्याचा प्रयत्न केला आहे.

वेगवेगळ्या लेखकांनीही अशा प्रकारचे स्तंभलेखन केले आहे. अच्युतराव कोल्हटकर, द. वि. ताम्हणकर, गंगाधर इन्दूरकर, विजय तेंडुलकर, रा. वि. टिकेकर, प्रमोद नवलकर, द. ता. भोसले, गंगाधर पानतावणे, लता राजे, ग. वा. बेहरे, प्रभाकर पाध्ये, अरुणा ढेरे, शं. ना. नवरे, शंकर सारडा, श्रीकांत पाटील, अरुण टिळेकर, रजनी दांडेकर, उज्ज्वला पाटील, अश्विनी भावे, सुप्रिया सरवटे अशा वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवर लेखकांनी स्तंभलेखन केले आहे. या सर्वांचे स्तंभलेखन लक्षवेधी आहे तसेच लक्षवेधी लेखन 'अर्थ आणि अन्वयार्थ' यामध्ये दिसून येते.

... LIBRARY
UNIVERSITY, KOLHAPUR.

थोडसे अवती भवती पाहिले की कितीतरी घटना लक्ष वेधून घेत असतात. काही घटना जीवनाचा नवा अर्थ विशद करतात. तर काही घटनांना चिरंतनाचा स्पर्श असतो. काही अस्वस्थ करणाऱ्या असतात. तर काही अत्तरासारख्या उडून जाणाऱ्या असतात. काही मनात घर करून राहतात. या सर्व घटनांचा आशय शोधणे आणि त्याचा अन्वयार्थ लावणे हा संवेदनशील मनाचा धर्म असतो. माणूस शोधणं फार अवघड असते. त्याची वृत्ती, प्रवृत्ती, संस्कारक्षमता आणि क्षमता या सर्वांचा शोध म्हणजे अभिव्यक्तीचा ध्यास व या ध्यासानेच गंगाधर पानतावणे यांनी 'अर्थ आणि अन्वयार्थ' मधून विविध घटनांचा, सर्जनांचा, कलात्मकतेचा, सांस्कृतिक आणि सामाजिक अंगाचा आणि अंतरंगाचा शोध घेतलेला आहे.

## 'अर्थ आणि अन्वयार्थ' ग्रंथाचा वाङ्मयीन दृष्टीने विचार

गंगाधर पानतावणे यांच्या 'अर्थ आणि अन्वयार्थ' या ग्रंथाचा वाङ्मयीन दृष्टीने विचार करत असताना त्यांनी केलेले लेखन खरोखरच ललित्यमय अशा विचार प्रकटीकरणाला त्यांनी महत्त्व देऊन ललित शैलीने लेखन केलेले आहे. यामध्ये त्यांनी केलेले व्यक्तिचित्रण, प्रसंग, भाषाशैली, संवादशैलीच्या दृष्टिकोनातून त्यांचे लेखन महत्त्वपूर्ण तर आहेच पण त्याचबरोबर त्यांनी केलेल्या अक्षरांचा, शब्दांचा, संवादाचा आणि भाषेचा वापर वैशिष्ट्यपूर्ण असा आहे. यादृष्टीनेच 'अर्थ आणि अन्वयार्थ' यातील लेखनाचा वाङ्मयीन दृष्ट्या विचार फार महत्त्वपूर्ण असा आहे.

गंगाधर पानतावणे यांच्या 'अर्थ आणि अन्वयार्थ' या ग्रंथामधील व्यक्तिचित्रणे सर्वोत्कृष्ट अशी आहे. त्यांच्या व्यक्तिचित्रणाच्या वर्णनामुळे त्या लोकांची स्वभाववैशिष्ट्ये त्यांचे व्यक्तिमत्त्व आपल्या समोर उभे राहते. यामध्ये 'कवीचा मृत्यू' या लेखामध्ये त्यांनी मृत्यू अटळ आहे. तो कोणालाही कधीही येऊ शकतो. त्याने केलेल्या कार्यामुळे तो नेहमी आठवणीत राहतो. त्याचप्रमाणे निरंजन उजगरे या नावाच्या कवीचा मृत्यू होतो. गंगाधर पानतावणे मृत्यूविषयी तेही एका कवीच्या मृत्यूविषयी म्हणतात, "मृत्यू अटळ असला तरी कवीचा मृत्यू अधिक व्याकूळ करतो. मग मृत्यूवर कसा विश्वास ठेवायचा. असं कैकदा मनात येते. त्यातले अनुबंध इतके गडद असतात की ती व्यक्ती काल होती, आज नाही. ही कल्पनाचा हळवी करते. जनन आणि गमन म्हणजे जय असेल तर अटळ अशा प्रवासाला पाठमोरं होणं शक्यच नसतं. थरथरत्या हातांनी काळाला अभिवादन करण एवढच आपल्या हाती उरतं." मृत्यूविषयी हे वक्तव्य खरोखरच मनाला लागून जाते.

निरंजन उजगरे यांनी अनेक कवितांचा अनुवाद केलेला आहे. स्वातंत्र्योत्तर भारतातील निवडक कवितांच्या अनुवादाचा 'काव्यपर्व' संग्रह कितीतरी भारतीय भाषांतील कवितांची मूळ रूपं विस्कटू न देता त्यांनी केला आहे. सर्व भाषा त्यांना अवगत होत्या असं नाही. हिंदी आणि इंग्रजीच्या आधारावर त्यांनी हा साक्षेप केला. निरंजन उजगरे यांचे 'काव्यपर्व' नंतर लक्षात राहते ते 'हिरोशिमाच्या कविता' या एक भारतीय भाषांच्या तर एक भारतीयेतर भाषेचा अनुवाद . हिरोशिमा म्हणजे भळभळत्या जखमा, माणसांची क्रूर कत्तल, रक्त आणि अश्रुंचा सडा, मानवी आकांताचे असे दारूणपण अन्य कुठे नसेल ! निरंजन उजगरे यांनी हिदेआकी इशिदा या जपानी लेखकाच्या साहाय्यान जपानी माणसांच्या दुःखाला वाट करून दिली. समाज आणि संस्कृतीतील विरुद्ध रूप निरंजनला सदैव अस्वस्थ करीत. म्हणूनच ते माणसाचं आक्रंदन जाणू शकत होता.

निरंजन उजगरे यांच्या कवितेची वैशेष्ट्य म्हणजे त्यांची कविता ही नेहमीच चिंतनातून निर्माण झालेली आहे. त्याच्यात आक्रस्ताळीपणा नाही शब्दावडंबराचा सोस नाही. भडकपणा, अतिरंजनाचा हव्यास नाही. माणसाच्या जगातल जे भावल ते उलगडत गेलं, शब्दही अर्थात भिजलेले आणि चिंतनाचा श्वास जपणारे. गंगाधर पानतावणे तर म्हणतात, ''आखाती देशात गेलेल्या शतावधी भारतीयांच्या भावविश्वाचे करपलेपण निरंजनला किती उत्कटतेने जाणवले. भारतीयांची आयुष्य जवळून पाहताना कैकदा निरंजन उन्मळून आला. अस्वस्थ झालेले कविमन म्हणाल ....

**गुन्हे करताना पकडले गेलेले**
**स्वदेशी परतव्याचा आदेश मिळालेले**
**पोलिसांच्या कोंडाळ्यातले**
**माझे नतमस्तक देशबांधव पाहिले**
**मनात दिमाखाने भरून येणाऱ्या**
**गाण्याच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडाल्या**
**होठों पे सच्चाई रहती है**
**यहाँ दिल में सफाई रहती है**
**हम उस देश के वासी है ...**

त्याचप्रमाणे या लेखाद्वारे मृत्यूनंतर ही निरंजन उजगरे यांची केलेली आठवण एका कवीची मृत्यूनंतर काढलेली आठवण गंगाधर पानतावणे यांनी 'अर्थ आणि अन्वयार्थ' द्वारे स्मरणात ठेवलेली आहे. गंगाधर पानतावणे निरंजन उजगरे बाबत म्हणतात, ''निरंजन उजगरेची कविता अशी काळजाला हात घालणारी, माणसाचं चिंतन करणारी, मानवाला आवाहन करणारी. निरंजन आता पुन्हा अशी कविता लिहायला नाही, ही व्यथा चिरंतन आहे. अनेक व्यवधान संभाळणारा, लोकजीवनाची नाळ सतत साधणारा कवी जगाच्या पडद्याआड जातो. तेव्हा कोण हे दुःख लपविणार नाही?'' कवीचे व्यक्तिमत्त्व त्यांच्या मृत्यूनंतर उलगडून दाखवण्याचा प्रयत्न गंगाधर पानतावणे यांनी केला आहे.

तसेच गंगाधर पानतावणे यांनी एका कलाकाराला मिळालेले सुखातून दुःख आणि एका साहित्यिकाला मिळाले दुःखातून सुख या सुख-दुःखाचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न 'घर देता का घर' या लेखामधून केला आहे. यामध्ये आयुष्य भर सुख भोगलेला, कला भोगलेला, वैभव भोगणारा नटसम्राट गणपतराव बेलवलकर खरोखरच्या जीवनात सत्याला सामोरे जातना उध्वस्त होतो. आयुष्यभर कलंदरपणे आपल्याच धुंदीत जगणारा हा माणूस व्यवहाराच्या पातळीवर शून्य ठरतो. त्याचा अहंकार अर्थहीन होता. त्यांच्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वाचे प्रवाहपतन होते. कलेवर त्यांची फार भक्ती होती. कुटुंबवत्सल होते. प्रेमावर त्यांची श्रद्धा होती. त्यांनी आपली मुलं साहेबी संस्कृतीत वाढवलेली होती. त्यामुळे त्यांना जुन्या पिढीविषयी कोणत्याही प्रकारची आस्था नव्हती. त्यामुळेच त्यांना आईवडिलांची, त्यांच्या म्हातारपणाची अडचण होते. अडगळ होते.

आप्पासाहेब बेलवलकरांची त्यांच्या मुलाने आणि मुलीने खूपच वाईट अवस्था बनवलेली होती. गालिच्यावर मातीचे पाय ठेवले म्हणून, 'आमचा संसार मलिन आणि अमंगल करण्याचा तुम्हाला अधिकार नाही' असे त्यांचा मुलगा नंदा बजावतो. त्याचप्रमाणे त्यांची सून शारदा, 'शिष्टाचार नाही, सौजन्य नाही, सभ्यता नाही, हे काय घर आहे ?' असे म्हणून सासू सासऱ्यांना घराबाहेर काढते. या दोघांसारखी त्यांची मुलगी नलुसुद्धा आपल्या नवऱ्याचा आईवडिलांकडून अपमान झाला म्हणून ती त्यांची रवानगी 'आऊट हाऊस' मध्ये करते व इथून त्यांच्या शोकांतिकेला सुरुवात होते. त्यातच त्यांची पत्नी कावेरीचा मृत्यू होतो आणि नटसम्राट सैरभैर होऊन 'घर देता का घर?' अशी हाक देतात.

याच्या उलट अवस्था होती ती एका साहित्यश्रेष्ठीची. पुण्यातील 'अनपट बिल्डिंग' ची आणि या बिल्डिंगच्या शेवटच्या माळ्यावर पाय पुरतील एवढ्या एका छोट्याशा लहानग्या खोलीत स्वत: एकटे समाधाने आयुष्य व्यतीत करणाऱ्या रा. ग. जाधव यांची. पण त्यांनी कुणालाच म्हटले नाही 'अहो घर देता का घर?' किंवा त्यांनी कुणालाच आळवणी केली नाही. खरोखरच कलावंताचे विश्वच वेगळे असते. गंगाधर पानतावणे त्यांच्याविषयी आणि त्यांच्या साहित्यसाधनेविषयी आणि रा. ग. जाधव यांच्याविषयी म्हणतात, ''एका अवघड जागी अवघड खोलीत राहून या तैलबुद्धी माणसानं ग्रंथ वाचले. खूप लिहिलं. पत्नीवियोगाचं दु:ख अंतर्मनात साठवून साहित्य साधना केली. अगदी निर्लेपपणे, निर्मत्सर वृत्तीने, एकटेपणा जपणारे कितीतरी कलंदर, लेखक-कलावंत महाराष्ट्र भूमीत असतील ! अडगळीत राहून साहित्यसाधना करीत असतील. 'अनपट बिल्डिंग' मधील मनस्वी साहित्य निर्माता. चहा, सिगरेट आणि पुस्तक हीच आपली उर्जा मानत राहिला. त्यान घरासाठी कुणाकडे हात पसरला नाही. शासनाकडे कधी याचना केली नाही. साहित्याची एकटेपणाला सोबत आणि एकटेपणाची साहित्याला. कलावंताचं विश्वच अनोखे असते. त्यांची धुंदी वेगळी असती. त्यांचं वैभवही वेगळं असतं. हे सर्व सुख दु:ख समोर आणण्याचे काम गंगाधर पानतावणे यांनी केले आहे. अचानक एक दिवस अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष पद त्यांच्याकडे चालून आले. मराठी माणसाचे प्रेम उफाळून आले आणि प्रा. रा. ग. जाधव या थोर साहित्यिकाला घर नाही हे कळतातच शासनाला, समाजसेवी संस्थांना, साहित्यिकांना पान्हा फुटवा त्याप्रमाणे काय करायला हवं याच्या नोंदी प्रकाशित झाल्या. पण इकडे मात्र लहानशा जागेत राहणाऱ्या 'साहित्यनिर्मात्याविषयी एकाकी उबळ झालेली पाहून 'अनपट बिल्डिंग' गालातल्या गात खुदूखुदू हसू लागली.' असे गंगाधर पानतावणे म्हणतात आणि 'सदनिका' नावाचे घर तयार केले. प्रा. रा. ग. जाधवांना घर मिळाले. अशाप्रकारे गंगाधर पानतावणे यांनी मात्र 'घर देता का घर' याचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न केला. त्यातून एका कलावंताचे सुखातून दु:खात रूपांतर आणि एका साहित्यिकाचे दु:खातून सुखात रूपांतर फक्त एका घरासाठी होते. याचे वर्णन गंगाधर पानतावणे यांनी या लेखामध्ये केले आहे.

गंगाधर पानतावणे 'सूर्यकुलातील कवींचा' गौरव करताना म्हणतात मराठी भाषेला आणि मराठी साहित्याला उजेडाचे दिवस यायला लागले आहेत. यातून त्यांनी मराठी साहित्याविषयी आणि मराठी साहित्यपुरस्काराविषयी आपले मत प्रकट केले आहे. गंगाधर पानतावणे यांनी साहित्यातील प्रवृत्ती साहित्यसंमेलने आणि साहित्यपुरस्कार यांवर प्रकाश टाकलेला आहे. यामध्ये

पहिल्यांदा साहित्यसंमेलने आटोपशीर होती. परंतु आताची साहित्य संमेलने म्हणजे साहित्यापेक्षा संमेलनेच जास्त झालीत. यावर त्याचे साहित्यभक्त मित्र नांदेडकर यांना सहजच म्हणालो. तर ते उखडलेच. म्हणाले, ''साहित्य संमेलन बंद केली पाहिजेत. काही ग्रेसच राहिला नाही. काय ते विषय ! काय ते वक्ते ! काय त्या मुलाखती ! काय ती कविसंमेलन ! आता रस वाटत नाही. तरीही मी जातो, भक्तिभावानं.'' यामध्ये नारायण सुर्वे यांना 'जनस्थान पुरस्कार' मिळाला. याबद्दल त्यांचा गौरव केला आहे. त्या पुरस्काराची कुसुमाग्रजांनी सुरूवात केलेली आहे. कुसुमाग्रजानंतर त्यांचे स्मरण रहावे म्हणून नाशिककरांनी हा पुरस्कार चालू ठेवला. कुसुमाग्रज असताना हा पुरस्कार पहिल्यांदा विजय तेंडुलकर यांना देण्यात आला. कुसुमाग्रजांप्रमाणेच नारायण सुर्वे हे सुर्यकुलातील कवी आहेत.

गंगाराम सुर्वे नावाच्या बापाला नारायण नावाचे अनाथ पोर सापडते आणि त्या पोराने म्हणजेच नारायण सुर्वे यांनी महानगरातील अदृश्य आणि अव्यक्त माणसाला चेहरा दिला. गंगाधर पानतावणे त्यांच्याविषयी म्हणतात, ''त्यांची कविता हेच त्यांचे पाथेय आहे आणि सन्मानही. ना घर, ना गणगोत हे लौकिक अर्थानं वास्तव असलं तरी 'जेथे जातो तेथे माझी भावंडे आहेत.' एवढेच नाही तर 'ब्राह्मण नाही, हिंदूही नाही, न मी एक पंथाचा' ही केशवसुती कुटुंबवृत्तीही आहे. कामगारांचं विश्व हा सुर्व्यांचा मातृकोश आहे. म्हणूनच सुख-दुःख, वास्तव ते प्रत्ययकारिकतेनं कवितेत मांडतात. कामगारांचा संघर्ष हा आपला संघर्ष आहे, याची जाणीव सातत्यानं त्यांच्या अंतरंगात आहे. आणि हाच त्यांच्या कवितेचा ध्यास आहे. माणसाचा शोध हीच त्यांची अंतऊर्मी आहे. आयुष्याची कैक वर्षे उलटली तरी आपल्याला काहीच गवसले नाही. 'मीही तरी मला अजून कुठे पुरता सापडलो ?' हा त्यांच्या आत्मशोधाचा निरंतर प्रवास आहे. माणसाइतका 'सृजनात्मा' नाही. असा प्रत्यय आहे.''

अशाप्रकारे नारायण सुर्वे यांनी माणसाच्या अंतर्मनाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. यामध्ये गंगाधर पानतावणे यांनी त्यांचे वाङ्मयीन व्यक्तित्व. एक साहित्यिक मन उलगडून दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे त्यांच्यातील कवीमन. ते म्हणतात माणूस समर्थ असल्याने समाज बदलून टाकण्याची क्षमता त्यांच्यात आहे. त्यांच्या कवितेतला माणूस हा कामगार आहे. परंतु तो अस्पृश कामगार असता तर आपल्याला सामाजिक आणि सांस्कृतिक दुःख प्रकट करणारे सुर्वे कळाले असते. गंगाधर पानतावणे म्हणतात, ''महानगरीय श्रमिकांचे शोषण

प्रत्ययकारिकतेने त्यांनी मांडले, आणि मराठी कवितेला आणखी एक दालन जोडले गेले. मात्र ग्रामीण कामगारांची, अस्पृश्य कामगारांची दु:खे सुर्वे नावाचा संवेदनशील कवी अधिक सशक्तपणे मांडू शकला असता, तर मराठी कविता अधिक व्यापक झाली असती. अस सारख वाटत राहातं. नामवंत समीक्षक प्रा. रा. ग. जाधव म्हणाले, ''नामदेव ढसाळांसारखा कवी आपल्याला जी कविता देतो ती खूपच व्यापक आणि सर्वस्पर्शी अशी असते.'' नारायण सुर्वे कामगारांविषयी म्हणतात,

**या क्षणी मनाच्या धर्मशाळेत जमलेत**
**सर्व सोबतीचे प्रवाशी**
**लिही आम्हावर म्हणत रांग**
**लावून उभे हृदयाच्या दाराशी**
**मित्र हो, तुम्हीच मुंबईच्या घडणीतील अमृत अक्षर**
**माझ्यावर या शहरावर तुमचेच हरघडी संस्कार**
**कसे तुम्ही काय वर्णू थोरवी, तुम्ही पोलाद, तुम्ही अलवार**
**फुले टपकन पडताच जखमा होतात हृदयावर**
**ही माणसं एकलेपणात सोबत काढून धीर देतात**
**जसे तुझे किनाऱ्यावरचे दिवे त्याच्यासोबत मिणमिणतात**

गद्यता आणि विधानात्मकतासुद्धा कवितेचे रूप घेऊ शकतात हे सुर्व्यांच्या कवितेवरून लक्षात येते.

नारायण सुर्व्यांचे विद्यापीठ मराठी कवितेत खूपच नवीन आहे. त्यांची कविता स्वत:शी आणि व्यक्तीशी बोलते. याबद्दल डॉ. सुधीर रसाळ म्हणतात, ''जीवनाबद्दलच्या वैचारिक - भावनिक प्रतिक्रिया ते वाचकांसमोर ठेवत असतात. आपले विचार, आपल्या भावना, आपल्या श्रद्धा जीवनाच्या काही अंगाबद्दल अनुकूलता तर काही अंगाबद्दल विरोध, जीवनाबद्दलच्या आपल्या अपेक्षा, आपली स्वप्ने हे सुर्वे वाचकांसमोर मांडत असतात.'' त्याचप्रमाणे नारायण सुर्वे यांच्या कवितेतील आत्मविश्वास न्याराच असतो. उदा.

**एकटाच आले नाही, युगाची साथ आहे**
**सावध असा तुफानाची हीच सुरूवात आहे**
**कामगार आहे, मी तळपती तलवार आहे**

अशाप्रकारे गंगाधर पानतावणे यांनी आपल्या लेखातून एका वेगळ्या व्यक्तिमत्त्वाचा म्हणजेच नारायण सुर्वे यांचा गौरव केला आहे. तसेच 'जनस्थान पुरस्काराचाही.'

गंगाधर पानतावणे यांनी आपल्या 'अर्थ आणि अन्वयार्थ' या ग्रंथामध्ये काव्यामध्ये क्रांती घडवून आणणारे कृष्णाजी केशव दामले म्हणजे केशवसुत यांचा गौरव 'नवा शिपाई' या लेखामध्ये केला आहे. साहित्यामध्ये आणि समाजामध्यें ज्यांनी ज्यांनी क्रांतिकारी पाऊले उचलली. त्यांच्या कार्याचा आढावा किंवा त्यांना अभिवादन हे केलेच पाहिजे. ज्याप्रमाणे सूर्याला सूर्यच म्हटले पाहिजे. त्याप्रमाणेच मराठी कवितेत नवीन युग निर्माण करणाऱ्या केशवसुताचे स्मरण करणे महत्त्वाचे आहे. त्याप्रमाणे त्याचे स्मरण 'अर्थ आणि अन्वयार्थ' ग्रंथाद्वारे करण्यात आले आहे.

केशवसुतांना फक्त चाळीस वर्षाचे आयुष्य लाभले. परंतु त्यांच्या निधनाला शंभर वर्ष पूर्ण झाली. पण 'कवी होता कसा आननी' हा प्रश्न अजुनही संपलेला नाही. प्रारंभी ग. त्र्यं. माडखोलकरांनी त्यांना 'महाकवी' असे ही म्हटले. परंतु त्यांच्यानंतर काही मतमतांतरेही झाली. या महान कवीने एवढी मोठी क्रांती काव्यामध्ये घडवून आणली. केशवसुतांची कविता नवी होती. पारमार्थिक आणि पौराणिक विषयांत रंगलेल्या मराठी कवितेला केशवसुतांनी ऐहिकाकडे नेले. सामाजिक अस्तित्वांचे भान दिले. पुराण-किर्तन, ईश्वरभक्ती, स्त्री-सौंदर्याची वर्णने यात रमून न जाता लौकिक विषयांना त्यांनी काव्यमय रूप दिले. नित्याच्या अवलोकने जन पहा, होती किती आंधळे. निसर्ग, प्रेमविषयक भावना आणि समाजवास्तवाचा वेध त्यांनी आपल्या काव्यामध्ये घेतला आहे. खऱ्या जीवनाचा शोध घेण्याचा प्रयत्न त्यांनी आपल्या काव्यामध्ये केला आहे. 'आम्हाला वगळा गतप्रभ झणी होतील तारांगणे' हा त्यांचा आत्मविश्वास होता.

पण काहींनी नंतर त्यांना दोषही दिले. यामध्ये कवी माधव ज्यूलियन यांनासुद्धा केशवसुतांच्या ठिकाणी आत्मकवित्वाची रोगट जाणीव प्रलयांकित झाली. ते म्हणाले, 'कवितेला उद्देशून प्रेमभाव व्यक्त करणे म्हणजे रोगट मनोवृत्तीच.' केशवसुतांचे मराठी कवितेवर अनंत उपकार असले तरी त्यांना महाकवी म्हणता येणार नाही असे निःसंदिग्धपणे मत प्रतिपादन करणारे प्रा. रा. श्री. जोग यांनी 'लालित्य' हा गुण केशवसुतांच्या काव्याचा विशेष केव्हाही आणि कोणत्याही अर्थाने होऊ शकला नाही, असे निभ्रांतपणे सांगितले. केशवसुतांना कोणी 'निराशावादी कवी' म्हणाले तर कोणी निव्वळ गद्यलेखक, कोणी केशवसुतांच्या कवित्वाला काव्यदेवतेच्या प्रसन्न मुखाचा प्रसाद योग कधी लाभलाच नाही, असे म्हटले तर कोणी कुत्सितपणे 'आत्मसाक्षात्काराची जाहिरात

करणारा कवी' म्हटले. पण एवढं मात्र खरे की कोणालाही केशवसुतांचे युगकर्तृत्व हिरावून घेता आले नाही.

गंगाधर पानतावणे त्यांच्याविषयी लिहतात, ''केशवसुतांच जीवनविषयक चिंतन, विविधांगी आहे, कधी ते 'तिमिरी आम्ही नित्य रखडणे । विवंचनातची जिणे कंठणे॥' अशी प्रतीती व्यक्त करतात, तर कधी हे जग दु:खाने भरलेले आहे, दु:ख माणसाला सतत दडपत असते. 'अमुचा पेला दु:खाचा । डोळे मिटूनी प्यायचा॥' अशी अंतर्मुखता ते व्यक्त करतात. 'भिकार या जगी, इच्छित न मिळे काही । म्हणून भिक्षांदेही तुझ्या पायी॥' अशी खंतही ते व्यक्त करतात आणि आम्ही देवाचे लाडके आहेत अशी सश्रद्धता व्यक्त करतानाच 'देव दानवा नरे निर्मिले । हे मत लोका कळवू द्या॥' असे माणसाचे श्रेष्ठत्वही ते प्रतिपादन करतात.''

केशवसुतांच्या भावकवितेतून तुकारामांच्या अभंगासारखीच हृदयस्फुर्तता प्रतीत होते. माणसाविषयीची केशवसुतांची मूल्यजाणीव छायांकित होती असे म्हणता येणार नाही. त्यांनी ईश्वराला, संस्कारांना, सामाजिक वास्तवाला कधीही नाकारले नाही. त्यांच्या पुढ्यात फुले आगरकरांचा क्रांतीविचार, समाजपरिवर्तनाचा, मूर्तिभंजनाचा विचार होता म्हणूनच केशवसुत म्हणाले 'नव्या मनूतील, नव्या दमाचा शूर शिपाई आहे। कोण मला वठणीला आणू शकतो ते मी पाहे॥' तसेच त्यांनी स्त्रीमुक्तीसाठी लिहले विषमतेविरुद्ध, जातीव्यवस्थेविरुद्ध लिहिले. त्यांनी 'अत्यंजाच्या मुलाचा पहिला प्रश्न मांडला. गंगाधर पानतावणे त्यांच्याविषयी लिहितात, ''सामाजिक वास्तवाला सामोरे जाणाऱ्या थोड्याच कविता त्यांनी लिहिल्या असल्या तरी त्यांचे अंतरंग तुकारामाप्रमाणेच व्यापक होते. 'मी स्वप्राणाने फुंकीन अशी एक तुतारी मला आणून द्या' हे केशवसुतांचे मागणे आगतिकतेचे नव्हते. तळहात पसरणारे नव्हते. फुले-आगरकरांच्या क्रांतिगर्भ विचारांचा तो अन्वयार्थ होता. फुल्यांच्या विश्वकुटुंबवृत्तीचा नि:शंक आविष्कार होता. म्हणून केशवसुत म्हणू शकले -

**ब्राह्मण नाही, हिंदूही नाही, न मी एक पंथाचा !**
**तेच पतित की जे आखडिती प्रदेश साकल्याचा॥**

अशा प्रकारे गंगाधर पानतावणे यांनी केशवसुतांच्या निधनाला शंभर वर्षे पूर्ण झाली त्या निमित्ताने त्यांनी त्यांच्या कार्याचे स्मरण केले आहे. त्यांनी केलेल्या कार्याविषयी व त्यातील गुणदोषांविषयी चर्चा केली आहे. पण त्यांनी काव्यामध्ये केलेली क्रांती हे सत्य निर्विवादपणे व सडेतोडपणे मांडण्याचा प्रयत्न व त्याबद्दल अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न केला आहे.

गंगाधर पानतावणे यांनी आपल्या 'अर्थ आणि अन्वयार्थ' या ग्रंथाद्वारे अनेक प्रतिभावंत व्यक्तींची, साहित्यिकांची, लेखकांची स्मरणे आणि नव्याने ओळख करून दिली आहे. यामध्ये 'बखर एका राजाची' यामध्ये ही बखर लिहणारे त्र्यं. वि. सरदेशमुखांची ओळख करून दिली आहे. ज्यावेळी गंगाधर पानतावणे आपले मित्र योगीराज वाघमारे आणि दत्ता गायकवाड यांच्या बरोबर त्र्यं. वि. सरदेंशमुख यांना भेटायला गेले होते. त्यांच्या घरी सर्वत्र पुस्तकेच होती.

यावेळी गंगाधर पानतावणे यांनी काढलेल्या 'अस्मितादर्श' या नियतकालिकाची त्र्यं. वि. सरदेशमुख आठवण काढतात. 'अस्मितादर्शतील' लेख छान असतात. नवीन लिहिणाऱ्या लेखकांचे ते कौतुक करतात. अस्मितादर्श या नियतकालिकाने अनेक नवीन लेखकांना लिहिते केले. त्यांना प्रोत्साहन देण्याचे काम केले आहे. त्र्यं. वि. सरदेशमुख यांनीही 'अस्मितादर्शसाठी'लिहिले होते. त्यामुळे 'अस्मितादर्श' च्या लेखनाची खुप मोठी परंपरा आहे. याबद्दल गंगाधर पानतावणे यांन खूप मोठा अभिमान वाटता.

त्र्यं. वि. सरदेशमुख यांनी अनेक प्रकारचे लेखन केले आहे. यामध्ये त्यांच्या पन्नास वर्षापूर्वीच्या कविता अजूनही नवीनच वाटतात. त्यावर त्र्यं. वि. सरदेशमुख म्हणतात, "त्यांचे काय आहे पानतावणे, मी मुळातच कवी आहे. कविता हा माझा आवडता प्रदेश आहे. तुलनेने मी कविता अधिक वाचतो सुद्धा. इंग्रजीतील बहुतेक सारे कवी मी वाचले आहेत. मराठीतील संत कवी, अलीकडेचे बहुतेक सारे कवी मी वाचले आहेत. मराठीतील संत कवी, अलीकडील ग्रेससारखे कवी मला आवडतात."

त्र्यं. वि. सरदेशमुख यांचे कादंबरी लेखन सुद्धा काव्यात्मकतेचे स्वरूप आहे. त्यांनी ज्या कादंबऱ्या लिहिलेल्या आहेत त्यामध्ये दीर्घकाव्याचा प्रत्यय येतो. त्यांच्या 'उच्छाद', 'बखर' या कादंबऱ्या उत्कृष्ट अशा आहेत. त्यांच्या कादंबरीतील साईखेड वरवर काल्पनिक संस्थान असलं तरी त्यातील माणसं घटना व्यक्तिरेखा हे सगळं वाचताना एका अद्भुत जगात प्रवेश केल्यासारखे वाटते. कारण वास्तव नवं आणि अनोख वाटत. राजे रघुवीरसिंह, त्यांचे खाजगी सल्लागार देसाई सारच अफलातून. त्यांच्या कादंबरीतील 'न मिलता गम तो बरबादी के अफसाने कहाँ जाते' गजल उत्कृष्ट अशी आहे असे गंगाधर पानतावणे सांगतात.

**न मिलता गम तो बरबादी के अफसाने कहाँ जाते**
**अगर दुनिया चमन होती तो वीराने कहाँ जाते ?**

**चलो अच्छा हुआ अपनों में कोई तो गैर निकला**
**अगर होते सभी अपने तो बेगाने कहाँ जाते ?**

ही गजल लता मंगेशकर यांनी गायलेली आहे.

गंगाधर पानतावणे यांनी साहित्यविश्वातील एका वेगळ्या साहित्यिकाचे स्मरण केले आहे. यामध्ये ते त्यांच्याविषयी म्हणतात, ''महानगर जीवनापासून, झगमगाटापासून नेहमीच दूर राहिलेल्या सरदेशमुख यांच्यासारख्या मनस्वी लेखकानं मराठी साहित्यात आपली स्वतंत्र आणि स्वयंभू अशी नाममुद्रा उमटवली. संवेदनशीलता आणि रसिकवृत्ती जोपासली. समीक्षेच्या प्रांतात सुजाण आणि सहृदय प्रतिमा निर्माण केली. कलाकृतीच मर्म उकलून दाखवणारा समीक्षक म्हणूनच त्यांची प्रतिष्ठा मराठीच्या साहित्यमुलखात होती. मूल्यात्मक लेखन हाच त्यांचा ध्येयवाद होता. म्हणूनच त्यांच्या निर्मितीला चिरंतनाचा गंध होता. मराठी वाङ्मयाची समीक्षा परंपरागत आणि कोरड्या स्वरूपाची असल्याचे त्यांनी प्रतिपादले होते. वृत्तपत्रीय परीक्षणांना समीक्षामूल्य नसतं, हे ते आवर्जुन सांगत. तंत्रमंत्र्याच्या आखाड्यांवर त्यांचा विश्वास नव्हता. त्र्यं. वि. सरदेशमुख 'गडकऱ्यांची संसारनाटके' या ग्रंथाच्या प्रस्तावनेत म्हणाले होते, ''समीक्षा ही केवळ ग्रंथोपजीवी आहे असा एक जुनाट भ्रम आम्ही घट्ट धरलेला आहे... ग्रंथाची ओळख करून देण्या-घेण्याचा उद्योग आरंभणाऱ्या जाणीवसंपन्न समीक्षेला जीवनविषयक अनुभवाला वाट पुसतच चालता येते.'' समीक्षेच्या क्षेत्रात अशी निर्लेप जाणीव सरदेशमुखांनीच निर्माण करावी.''

गंगाधर पानतावणे यांचा 'अर्थ आणि अन्वयार्थ' हा ग्रंथ उत्कृष्ट अशा स्वरूपाचा आहे. यामध्ये पानतावणेंनी अनेक वेगवेगळ्या ज्येष्ठ आणि श्रेष्ठ अशा साहित्यिकांची नव्याने ओळख करून दिली आहे. यामध्ये हे जे साहित्यिक आहेत हे कोणत्या समाजातील आहेत, त्यांचे राहणीमान, त्यांचा समाज, त्या समाजातील लोकजीवन, लोकसंस्कृती या साऱ्यांचा प्रत्यय हा त्यांच्या स्तंभलेखनावरून लक्षात येतो. याचा प्रत्यय आपणास 'तांडा'काराचे निर्वाण या त्यांच्या लेखातून होते. 'गोर-बंजारा' या समाजात जन्मलेले आत्माराम कनीराम राठोड हे या लेखकाचे नाव. यांचे निधन झाल्यावर हा लेख गंगाधर पानतावणे यांनी लिहिला आहे. आत्माराम राठोड हे आपल्या गोर-बंजारा लोकजीवनावर कितीतरी वेळ बोलत. त्यांच्या अंतरंगातला कवी, संशोधक आणि माणूस उधाणून येत असे. त्यांच्या कविता म्हणजे जीवनानुभवच असत. ते अस्मितादर्शमध्ये 'सगुणा पुजारी' या स्त्री नावाने आपल्या कविता पाठवत असत. याबद्दल गंगाधर पानतावणे यांनी

स्वत:च्या नावाने कविता प्रसिद्ध करा असे बजावले होते. आत्माराम राठोड यांचा 'लदेणी' हा काव्यसंग्रह उत्कृष्ट असा आहे.

गोर-बंजारा संस्कृतीची आणि लोकजीवनाची मांडणी केली पाहिजे. हा कितीतरी वर्षाचा आत्माराम राठोड यांचा ध्यास होता. त्यासाठी त्यांनी प्रचंड पराकाष्ठा केली. संशोधन निर्लेपपणे करायचे असते, सत्याचा शोध घ्यायचा असतो. याचं त्यांना भान होते. त्यामुळेच त्यांनी इतिहास ग्रंथ हाताळून त्यातून बंजारा लोकगण भारतीय आदिम जीवनातील एक स्वतंत्र लोकगण असल्याचं प्रतिपादन केले.

यवतमाळ जिल्ह्यातले पुसदजवळचे मेहा हा त्यांचा तांडा. त्यांचा जन्म आणि बालपण ही इथेच गेले. तांडातील जीवनानुभव खूप वेगळे आहेत. यामध्ये चालीरीती, सण, व्यवहार, विवाहसंबंध, पंचायत हे खूप वेगळे आहे. हे सांगत असताना गंगाधर पानतावणे यांनी सर्व जवळून पाहिले होते. ते सांगतात आत्मारामाचं दारुशी नातं बालपणीच जडले होते ते रीतिरिवाज म्हणून. दारिद्रय, अज्ञान, राजकीय नीती, कार्यकर्त्यांची हडेलहप्पी हे सर्व त्यांनी आपल्या 'तांडा' या आत्मचरित्रात लिहिलेले आहे. कॉलेजमध्ये शिकत असताना एका ब्राह्मण मुलीशी जडलेले स्नेहसंबंध. पण पुढे बेबनाव, अपयश, मानसिक क्लेष, एक बंजारा मुलगा आणि ब्राह्मण मुलगी, ताटातुटीसाठी एका प्राध्यापक पित्यानं केलेले खटाटोप, मनाची घालमेल, अपयश, आतडं पिळवटून टाकणारे अनुभव पण कुठेही आक्रसताळेपणा नाही. आदळाआपट नाही. ते आतल्या आत विझून गेलेले होते. या सर्वांच विवेचन गंगाधर पानतावणे यांनी केलेले आहे. त्यांच्या तांडा या आत्मचरित्राला अस्मितादर्शचा पुरस्कार मिळाला तेव्हा आत्माराम राठोड यांना खूप आनंद झाला.

आनंद सणाला तरुणी समृद्धीसाठी गाणं कशाप्रकारे गातात हे त्यांनी सांगितले आहे. त्याचप्रमाणे त्यांनी गंगाधर पानतावणे यांना जी पत्रे पाठवली त्यातून ते अस्वस्थ जाणवायचे आणि नंतर त्यांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारला आणि आपले नाव बदलून त्यांनी डॅनियल राणा ठेवले. त्यांनी ख्रिस्ती गीतं लिहिली. बायबलच्या काही भागाचे अनुवाद बंजारा भाषेत केले. बायबलमधील सामाजिक संदर्भ आणि भारतीय भटके हे पुस्तक लिहिलं.

गंगाधर पानतावणे त्यांच्याविषयी लिहितात, ''आत्मारामला कवी म्हणून मान्यता होती. संशोधक म्हणून मान्यता होती. म्हणूनच आंबेडकरी साहित्य संमेलन आणि विद्रोही साहित्य संमेलन यांची अध्यक्षपदे त्यांच्याकडे चालत आली. हा त्यांच्या वाङ्मयीन गुणवत्तेचा गौरव

होता. त्यांच्या अध्यक्षीय भाषणात साहित्य समाज संस्कृतीचे संदर्भ होते. परिवर्तन आणि आंबेडकर निष्ठा ओतप्रोत भरलेली होती. श्रमिकांसाठी, कष्टकऱ्यांसाठी, उपेक्षितांसाठी अभावग्रस्तांसाठी झटणं झगडणं हे आत्मारामनं आपल्या व्यक्तिमत्त्वाचे अभिन्न अंग मानले होते.

अशा गुणवैशिष्ट्यांनी भरलेल्या साहित्यिकांचे निर्वाण झाल्यामुळे गंगाधर पानतावणे यांनी खंत व्यक्त केली आहे. असा साहित्यिक पुन्हा मिळणार नाही याचीही खंत गंगाधर पानतावणे यांनी व्यक्त केली आहे. यामध्ये आत्माराम कनिराम राठोड या लेखकाची अनेक गुणवैशिष्ट्य 'तांडा काराचे निर्वाण' या लेखाद्वारे मांडली आहेत.

अशाप्रकारे गंगाधर पानतावणे यांनी वाङ्मयीन क्षेत्रातील मान्यवर व्यक्तीचा त्यांच्या साहित्यलेखनाचा त्यांच्या जीवनपटाचा आढावा घेतला आहे. त्यांच्या लेखनाचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न केला. गंगाधर पानतावणे यांनी आपल्या 'अर्थ आणि अन्वयार्थ' ग्रंथाद्वारे अनेक व्यक्तींची चित्रणे त्यांनी मांडली आहेत.

## 'अर्थ आणि अन्वयार्थ' ग्रंथातील सामाजिक लेखन

गंगाधर पानतावणे यांनी आपल्या 'अर्थ आणि अन्वयार्थ' ग्रंथामध्ये विविधांगी विषयांना हात घातलेला आहे. विविध क्षेत्रातील व्यक्तींचा, घटनांचा, प्रसंगाचा वेध या ग्रंथामध्ये घेतलेला आहे. गंगाधर पानतावणे यांनी अनेक विस्मरण झालेल्या दुर्लक्षित झालेल्या घटनांना प्रकाशमान करण्याचा प्रयत्न केला आहे. अनेक सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, धार्मिक, क्रीडा, सांस्कृतिक अशा विविध वैशिष्ट्यपूर्ण क्षेत्रातील घटनांचे अंतरंग उलगडून त्याचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न केला आहे.

गंगाधर पानतावणे प्रमाणेच द. ता. भोसले यांनीही ग्रामीण जीवनातील विविध क्षेत्रातील विविध व्यक्तींचा, प्रसंगांचा, घटनांचा परामर्श 'पार आणि शिवार' या ग्रंथामध्ये घेतला आहे. याबद्दल आपल्या 'पार आणि शिवार' या ग्रंथाच्या प्रस्तावनेत ते म्हणतात, ''आधुनिकतेच्या पायवाटेने जाणाऱ्या या ग्रामीण जीवनात नवे प्रश्न, नव्या समस्या तितक्याच तीव्रतेने उत्पन्न झालेल्या आहेत. अजुनही या खेडुतांच्या हाडीमासी रुतलेल्या अनिष्ट गोष्टी नष्ट झालेल्या नाहीत. याबद्दल त्या ग्रामजीवनातील नव्याने निर्माण झालेले प्रश्न, नव्याने निर्माण झालेली दुःखे, आणि त्यामुळे या जीवनाला येणारी अवकळा वाचकांसमोर व्यक्ती, प्रसंग, घटना यांच्या रुपाने मांडावी, असे मला ग्रामीण जीवनातून वावरताना सातत्याने जाणवत होते. खेडुत जनतेला ज्या नानाविध दुःख-भोगातून

जावे लागते, त्याचे दर्शन घडवावे असे जाणवत होते. त्याचप्रमाणे मुक्त आणि नैसर्गिक जीवनाला वंचित झालेल्या नागर मनाला खेड्यातील शाश्वत आनंदाचाही परिचय करून द्यावा, असे मनात येत होते. पण या आनंदापेक्षा मला ग्रामीण भागात भावले ते दु:खच ! नव्या समस्येतून जन्माला आलेले दु:ख, अज्ञान, अंधश्रद्धा, दारिद्रय, राजकारण, शोषण, विकृत धारणा, सहकाराचा होणारा वापर, भूमीहीन मजुरांच्या जीवनाला आलेली दारिद्रयाची, भुकेची ग्लानी हीच अधिकांशाने आजुनही खेड्यातून आढळते. या साऱ्यातून आपण काय साधले आणि काय गमावले याचीही जाणीव व्हावी असे वाटत होते. यातूनच हे पारावरचे आणि शिवारातले जग मी साकार करण्याचा मन:पूर्वक प्रयत्न येथे केला गेला आहे.'' पुढे जाऊन द. ता. भोसले म्हणतात, ''कोणतीही भूमिका वा राजकीय विचारसरणी न स्वीकारता मला भावलेल्या आजच्या खेड्याचे दर्शन घडविले आहे. हे नमूद करावेसे वाटते. या लेखातून दु:ख, दारिद्रय, भूक, आगतिकता, शोषण यांचे रंग अधिक प्रमाणात जाणवतात असे असले तरी सधन मनाला जाणणारा मुठभर शेतकरी वर्ग सोडला तर आजची ग्रामीण जनता याच प्रकारचे आयुष्य जगते आहे, हेही विसरुन चालणार नाही. म्हणूनच आपल्या शापित आणि उध्वस्त जीवनाचे ओझे निमूटपणे वाहून नेणारी माणसेच या संग्रहात अधिक जाणवतात.'' अशा विविध प्रकारच्या जीवन जगणाऱ्या माणसांच्या जीवनाचा परामर्श द. ता. भोसले यांनी घेतला आहे. अशा प्रकारचे जीवन जगणाऱ्या माणसांना त्यांनी जवळून पाहिले आहे. त्याचेच चित्रण त्यांनी 'पार आणि शिवार' या ग्रंथामध्ये केले आहे.

'अर्थ आणि अन्वयार्थ' या ग्रंथामध्ये सुद्धा विविध क्षेत्रातील प्रकर्षाने जाणवलेल्या किंवा वेळेनुसार समोर आलेल्या किंवा काही अज्ञात घटना प्रकाशमान करण्याचा प्रयत्न गंगाधर पानतावणे यांनी केला आहे. यामध्ये त्यांना जे जाणवले, भावले किंवा त्या घटनाविषयी जनसामान्य लोकांनी केलेली प्रतिक्रिया, त्यांच्या मनातून व्यक्त झालेल्या भावना या सर्वांचा अन्वयार्थ लावत असताना लोकांच्या भावना न दुखावता, लोकांच्या मनाचा विचार करून त्यांनी स्तंभलेखन केले आहे. आपली सडेतोड भूमिका मांडत असताना त्यांनी सहसंदर्भ ही दिले आहेत. या सर्वांचा विचार करूनच त्यांनी 'अर्थ आणि अन्वयार्थ' या ग्रंथामध्ये लेखन केले आहे.

'अर्थ आणि अन्वयार्थ' या ग्रंथामध्ये अनेक सामाजिक प्रश्नांना गंगाधर पानतावणे यांनी प्राधान्य दिले आहे. यामध्ये 'अहंकाराचा हिमालय' या लेखामध्ये त्यांनी जळगावाच्या वृत्तपत्रात एक अर्थतज्ज्ञ म्हणाले ''पाश्चिमात्य जगातील ९९.९९ टक्के लोकांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर

यांचे साधे नावही माहीत नाही. पण माझ्या 'आमचा बाप अन् आम्ही' या आत्मकथनाचा इंग्रजी अनुवाद झाला की बाबासाहेबांच नाव परदेशात जाईल. हे वाचून गंगाधर पानतावणे सुन्न झाले आणि या वाक्याचा परामर्श त्यांनी यामध्ये घेतला आहे. ते म्हणतात मी सुन्न झालो. बाबासाहेबांच्या जीवनचरित्राची अनेक घटना त्यांच्या डोळ्यासमोरून गेल्या. गोलमेज परिषदेच्या कारणाने ते साऱ्या जगाला माहित झाले होते. इंग्रजांच्या देशात जाऊन त्यांनी ब्रिटीश सत्तेशी झुंज दिली. हे सर्व आठवत होते. ते म्हणतात, ''प्रतिकुलतेशी संघर्ष करीत वाट चालणारी माणसं काहीच असतात. ध्येयासक्ती त्यांच्या आयुष्याला आकार देत राहते. ज्यांच्या पूर्वजांना हातात पुस्तक घेण्याची मनाई होती, ही माणसं समुद्रापार जातात आणि आपल्या ज्ञानानं जगाला विस्मित करतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर तर शून्यातून उभे राहिले होते. भाकरी हे त्यांनी आपल्या आयुष्याचं अंतिम सूत्र कधी मानलच नाही. स्वातंत्र्य आणि संस्कृतीचा ध्यास हेच त्यांच जिवितध्येय. भाकरी माणसाचं शरीर जगवते, पण संस्कृती माणसाचं जीवनच फुलवते.

जेव्हा नरेंद्र जाधवांना इंडियाना विद्यापीठानं 'सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय विद्यार्थी' म्हणून जाधवांचा गौरव केला, तेव्हा ते म्हणाले, ''या पारितोषिकाचे खरे मानकरी म्हणजे माझे दादा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची 'सर्च फॉर एक्सलन्स' ची शिकवण. आम्हा भावंडांच्या मनात खऱ्या अर्थाने रुजवली असेल तर ती दादांनी.'' डॉ. नरेंद्र जाधवांनी अमेरिकेतील विद्यापीठात डॉक्टरेटचा प्रबंध सादर करताना अर्पणपत्रिकेत जाधवांनी लिहिलं 'धिस डिझर्टेशन इज डेडिकेटेड टू माय बिलवेड पेरेन्टस् अॅन्ड द एव्हर इन्स्पायरिंग मेमरी ऑफ डॉ. बाबासाहेब आंबेडकर.' नरेंद्र जाधवांची जडणघडण, वैचारिक बैठक केवळ वडिलांमुळेच निर्माण झाली आणि बाबासाहेब ?

गंगाधर पानतावणे यांनी अनेक घटनांचा वेध घेतलेला आहे. त्यामध्ये आयुष्य कसं जगायचं हे माणसाच्या हाती असतं अशा वेगवेगळ्या पद्धतीत जीवन जगणाऱ्या माणसांचा शोध गंगाधर पानतावणे यांनी घेतलेला आहे. यामध्ये सुनील दत्त नावाच माणूस हा सिनेमा सृष्टीमध्ये त्यांनी आपले नाव कमावलेले आहे. यामध्ये सामाजिक स्तरावरील जातीभेदाचे चित्रण त्यांनी केलेले आहे. यामध्ये त्यांनी जमिनदार घराण्यात जन्मलेल्या सुनील दत्त आणि त्यांच्या परिवाराने अखंड भारत पाहिलेला होता. परंतु फाळणीने माणुसकीवरील विश्वास उडालेला आहे. दंगल, कत्तल, अमानुषता डोळ्यांनी पाहताना कालपर्यंत अत्मियतेने जगणारी हिंदू मुसलमान कुटुंब आता शत्रुसारखी परस्परांवर तलवारी उगारत होती. सुनील दत्तच्या श्रीमंत काकांना केवळ हिंदू म्हणून तुकडे तुकडे

करून मारून टाकले. अशा या हिंदू मुसलमान लोकांच्यातील संघर्ष मांडताना अनेक लोकांनी मिश्र विवाह केलेले आहेत. त्यामध्ये मालिनी पागंदीकरांनी १९२७ मध्ये गुलाबखान बशरुद्दीन यांच्यानी १९२७ मध्ये विवाह केला. असे अनेकांनी आंतरजातीय विवाह केलेले आहेत. यामध्ये रवींद्रनाथ टागोरांनीही मिश्र विवाहाचे समर्थन केलेले आहे. त्याचप्रमाणे नर्गिस यांनीही सुनील दत्तशी विवाह केलेला आहे. त्यावर त्यांना अनेकांनी दूषणे दिली पण त्यांनी त्यावर लक्ष दिले नाही. मुस्लिम असलेल्या मुलीवर त्यांचे विलक्षण प्रेम होते. पण त्यांनी त्यांच्यासाठी समाजाशी विलक्षण संघर्ष केला. त्यांचे एकमेकांवरील प्रेम तसेच राहिले आणि नर्गिसचे धार्मिक स्वातंत्र्य त्यांनी कधीच नाकारले नाही. त्यांच्याविषयी गंगाधर पानतावणे यांनी म्हटले आहे की, ''काळाचं आव्हान स्वीकारीत स्वीकारीत सुनील नर्गीस वाट चालत चालत कलेच्या आणि राजकारणाच्या क्षेत्रात दोघांचाही गौरव झाला. भिन्नधर्मिय विवाहाचा हा मनस्वी विजय होता. पण त्याची वाच्यता या दोघांनीही केली नाही. एकमेयता हाच त्यांचा विश्वास होता. श्वास होता म्हणूनच अपयशाच भय त्यांना कधी वाटले नाही. शेवटी नर्गिस कॅन्सरने ग्रस्त होऊन तिचा मृत्यू झाला. त्यावर सुनील दत्त म्हणाले आपले डोळे काढून नर्गिसच्या कबरीत पुरावेत म्हणजे अनंत काळापर्यंत मी तिच्याकडे पाहत राहीन.

त्यानंतर गंगाधर पानतावणे यांनी आपल्या आणखी एका लेखामध्ये एका वेगळ्या व्यक्तिमत्त्वाचं चित्रण केलेले आहे. यामध्ये देशाची प्रतिमा केवळ राजकारणानं निर्माण होते असे नाही तर त्या देशातील कला, साहित्य, उद्योग, क्रीडा, वास्तुशिल्प, तत्त्वज्ञान, तंत्रज्ञान हे सुद्धा देशाला प्रतिष्ठा, लौकिक आणि गौरव प्रदान करतात. यामध्ये ताजमहालाची आठवण उगाच येत नाही ! कालिदास किंवा टागोर का आठवतात. विश्वेश्वर आणि जे. कृष्णमूर्ती आपल्या आदराची स्थान का होतात ? कुमार गंधर्व आणि रविशंकर यांची स्वर शिल्प आणि नादशिल्प आपल्याला का मोहवितात ? असेच वेगवेगळ्या क्षेत्रातील घटना, गोष्टी ज्याप्रमाणे आपल्याला वेड लावतात त्याचमध्ये आपल्या देशाचा राष्ट्रीय खेळ हॉकी. या खेळातील जगाला वेड लावणारा माणूस मेजर ध्यानचंद. या खेळाडूचं असामान्य व्यक्तित्व त्याचं कौतुक आणि अनेकांना लक्षातही न येणारा राष्ट्रीय खेळातील व्यक्ती मेजर ध्यानचंद यांचे आगळेवेगळे व्यक्तिमत्त्व त्यांनी आपल्या स्तंभलेखातून मांडलेले आहे.

शंभर वर्षापूर्वी अलाहाबादला जन्मलेल्या आणि झाशीत बालपण घालविलेल्या सैन्यातील सुभेदाराचा मुलगा ध्यानचंद सोळाव्या वर्षी आपल्या वडिलांच्या मागोमाग सैन्यात भरती झाला. खेळ हा त्याचा ध्यास होता. खांद्यावर बंदूक घेतघेतच त्यांनी हॉकी स्टिकही घेतली आणि पाहता पाहता त्यांनी आपल्या खेळाने सगळ्यांना मोहवून टाकले. सैन्यात विविध प्रदेशात खेळ खेळताना त्यांनी अनेक क्रीडारसिकांचे लक्ष वेधून घेतले आणि मेजर ध्यानचंद जगातला एक श्रेष्ठ हॉकीपटू झाला. त्यांच्या हॉकी स्टिकला चेंडू चिटकून राहायचा. काहींनी त्यांच्या हॉकी स्टिकला मॅग्नेट चिटकवल्याचा आरोप केला. पण हे सर्व आरोप त्यांनी खोडून काढले. एवढेच नव्हे तर खेळत असताना त्यांची स्टिक बदलून त्यांना दुसरी देण्यात आली पण त्यांच्या खेळात फरक पडला नाही.

तिन्ही ऑलिंपिकमध्ये भारताने सुवर्णपदक मिळविली. ध्यानचंद त्यावेळी तळपता सूर्य होता. भारताच्या ३३८ गोलांमध्ये ध्यानचंदचे एकट्याचे १३३ गोल होते. १९३६ सालची जर्मनीतील बर्लिनमधील ऑलिंपिक अविस्मरणीय होती. जगज्जेता होण्याचं स्वप्न पाहणारा खुद्द फ्यूरर ॲडॉल्फ हिटलर ध्यानचंदच्या जादूई खेळाने मात्र देहभान हरपला आणि मेजर ध्यानचंद यास जर्मनीस येण्याचे आमंत्रण दिले. परंतु ध्यानचंद अत्यंत नम्रपणे हिटलरला म्हणाले, ''सर फार मोठ्या कुटुंबाचा भार पेलावा लागतो मला. मला माझ्या घरी राहिले पाहिजे.'' यावरूनच हिटलरच निमंत्रण नाकारणारा ध्यानचंदाशिवाय जगात दुसरा कोणी असेल का ?

१९४९ मध्ये या जादुगाराने निवृत्ती जाहीर केली. आपल्या मुलाला हॉकीस्टिक घेऊन उभा राहिलेला पाहिले. १९७६ मध्ये मॉन्ट्रियल ऑलिंपिक मध्ये आपला मुलगा असूनही भारत हरला. त्यांना मनस्वी दुःख झाले. पंख छाटलेल्या पक्षासारखी त्यांची स्थिती झाली. आणि त्यांनी आयुष्यामध्ये खूप काही कमवले. परंतु मुलांकडून भारत हारला हे दुःख त्यांना सहन झालेले नाही. ध्यानचंदला अनेक मानसन्मान मिळाले.

गंगाधर पानतावणे यांनी आपल्या 'अर्थ आणि अन्वयार्थ' ग्रंथामध्ये ज्याप्रमाणे विविध व्यक्तींची चित्रणे केली आहे. त्याचप्रमाणे 'अठरा तास अभ्यास' या लेखामध्ये अभ्यासाचे महत्त्व सांगत असताना अठरा तास अभ्यास करणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आदरांजली म्हणून भोकर तालुक्यातील मातूळच्या एकशे चाळीस विद्यार्थ्यांनी शाळेत सलग अठरा तास अभ्यास केला. या घटनेचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न गंगाधर पानतावणे यांनी केला आहे. यामध्ये त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेला अठरा तास अभ्यास आणि विद्यार्थ्यांनी आदरांजली म्हणून

केलेला अठरा तास अभ्यास. या घटनेतील प्रतीकात्मकता दर्शविण्याचा प्रयत्न केला आहे. यामध्ये त्यांनी संघर्षाला, आंदोलनाला आणि दानाला प्रतीकात्मकता असू शकते का ? कारण गंगाधर पानतावणे म्हणतात क्रियाशिलतेला अधिष्ठान असावं लागतं. संघर्ष प्रत्यक्ष करावा लागतो. आंदोलन जागवावी लागतात. दानाचा मुखवटा चढवता येत नाही. अशाप्रकारे त्यांनी प्रतिकात्मकता दाखवली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे ग्रंथप्रेम आणि ग्रंथनिष्ठा जगावेगळीच होती. आपल्या ग्रंथासाठी स्वतंत्र राजगृह बांधणारा असा महापुरुष विरळच. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अमेरिकेतील आणि विलायतेतील अभ्यासकाळात विश्वास बसणार नाही इतका अभ्यास केला. ज्ञानार्जन आणि ज्ञानार्जन ! कोलंबिया विश्वविद्यालयातील ग्रंथालय हे त्यांचे दुसरं घरच होतं. जॉन डुईसारख्या शिक्षण तज्ज्ञाचा सहवास लाभला होता. अभ्यासाशिवाय दुसरं काहीच त्यांना आकर्षित करू शकलं नाही.

डॉ. बाबसाहेब आंबेडकरांच्या ज्ञानार्जनाविषयीची माहिती सांगताना गंगाधर पानतावणे म्हणतात, ''लंडनमधील 'ब्रिटीश म्युझियम' या महाग्रंथालयात तर बाबासाहेबांनी रात्रीचा दिवस केला. याच ग्रंथालयात जागतिक कीर्तीच्या अभ्यासकांनी तासन तास अभ्यास केला होता. त्यात मार्क्स होता, कार्लाईल होता, हेगेल होता आणि खूप होते. मार्क्सच्या 'कॅपिटल' ची साधना इथंच झाली असावी. आरंभीची डायलेक्टिकचा विचार हेगेलच्या मनात इथेच स्फुरला असावा.''

अशाप्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीही अठरा-अठरा तास अभ्यास इथेच केला. ही ज्ञानसाधना होती. केवळ अभ्यासक्रमाच्या पुस्तकांचा अभ्यास नव्हता. एका हातात पावाचा तुकडा नि दुसऱ्या हाती ग्रंथ सावरत दुसरं काही नाही. ते अजिबात वेळ वाया घालवत नसत. पण गंगाधर पानतावणे सांगतात, ''पुष्कळसे भारतीय विद्यार्थी अकारण वेळ घालवीत. क्लबात त्यांना प्रवेश नसे. सरंजामदारी क्लबच्या बाहेर पाटी असे 'इंडियन्स ॲन्ड डॉग्ज आर नॉट अलाऊड !' मडमांच्या कमरेत हात घालून 'बॉल डान्स' करायची त्यांची महत्त्वकांक्षा तशीच विरुन जायची. तेव्हा बाबासाहेब आंबेडकर अभ्यास करत असायचे. तेव्हा त्यांना भारतीय मित्र खोचकपणे म्हणत, ''आंबेडकर तुम्हाला विश्वविद्यालयाचे रेकॉर्ड ब्रेक करायचे आहे ना ! मोठा नावलौकिक मिळवायचा आहे ना !'' पण बाबासाहेब स्मित करून पुन्हा पुस्तकात बाहेरचे जग विसरून जात.

बाबासाहेबांचे ब्रिटीश म्युझियम मधले दिवस अखंड अभ्यासाचे होते. उगाच नाही त्यांना लंडन विद्यापीठाने अर्थशास्त्रातील डी. एस्सी. ही पदवी दिली. आठ वर्षाचा अभ्यासक्रम त्यांनी केवळ सव्वादोन वर्षातच पूर्ण केला. डी. एस्सी. प्राप्त करणारे हे पहिले भारतीय होते.

त्यांच्या बद्दल गंगाधर पानतावणे आपल्या 'अर्थ आणि अन्वयार्थ' ग्रंथातील लेखात म्हणतात, "डॉ. बाबासाहेबांनी महत्त्वपूर्ण ग्रंथरचना केली. ती अखंड अभ्यासातून, अफाट ग्रंथसंग्रह केला. रात्रंदिवसाच्या वाचनामुळे डोळ्यांवर परिणाम झाला. ऑपरेशन करावे लागले. तेव्हा त्यांनी पुन्हा:पुन्हा खंत व्यक्त केली. "आता आपण बरेच दिवस वाचनाला मुकणार !" नालंदा विश्वविद्यालयाला भेट देताना ते हळहळले. दु:ख व्यक्त केले. म्हणाले, "अरे हे ग्रंथ वाचायचेच राहून गेले."

अशा प्रकारच्या आठवणी त्यांनी सांगितल्या आहेत आणि केवळ प्रतीकात्मक रीतीने शाळेत अठरा तास अभ्यासाची पुस्तक वाचणं हा सोपस्कार झाला. बाबासाहेबांना आदरांजली म्हणून बसायचं आणि इतर दिवशी काय करायचं. पुन्हा पुस्तकांकडे ढुंकूनही पहायचे नाही. याला अभ्यासनिष्ठा, ज्ञाननिष्ठा म्हणायचं का ? ज्ञानाला मर्यादा नसतात. ज्ञानकोश हा जीवाचा कोश व्हायला हवा आणि जीवनकोश करायला हवा. म्हणून गंगाधर पानतावणे म्हणतात, "महापुरुषांच्या जीवनातून आदर्श घ्यायचे असतात आणि आयुष्याची परिक्रमा आरंभायची असते. ध्येयधुंद नि ध्यासधुंद व्हायचे असते. प्रतीकात्मकता उडून गेलेल्या अत्तरासारखी असते."

अशा प्रकारे गंगाधर पानतावणे यांनी आपल्या 'अर्थ आणि अन्वयार्थ' ग्रंथामध्ये विविध प्रकारच्या विविध क्षेत्रातील व्यक्तीची व्यक्तिचित्रण केली आहेत आणि अशा महापुरुषांचा कार्याचा, जीवनाचा आदर्श वाचकांपुढे ठेवून प्रेरणादायी असे चित्रण केले आहे. यामध्ये विविध प्रकारच्या म्हणजे सामाजिक, वाङ्मयीन, राजकीय, क्रीडा, सिनेमासृष्टीतील महत्त्वपूर्ण व्यक्तींच्या कार्याचा आढावा आल्या आपल्या ग्रंथामध्ये घेतलेल्या आढळून येतो. त्यांचे जीवनचरित्र नव्याने प्रकाशमान करण्याचे काम गंगाधर पानतावणे यांनी केले आहे. निरंजन उजगरे, प्रा. रा. ग. जाधव, सुनील दत्त, केशवसुत, त्र्यं. वि. सरदेशमुख, मेजर ध्यानचंद, आत्माराम कनीराम राठोड, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशा विविध प्रकारच्या महापुरुषांचे जीवनचरित्र वेगवेगळ्या प्रकारच्या क्षेत्रातील आहे. यांचे जीवनचरित्र म्हणजे वाचकांना किंवा समाजाला एक प्रेरणा देणारे जीवनाला एक नवी दिशा देणारे असे आहे हे, सर्व समाजापुढे मांडण्याचे काम गंगाधर पानतावणे यांनी आपल्या 'अर्थ आणि अन्वयार्थ' ग्रंथाद्वारे केले आहे.

अशा अनेक सामाजिक ग्रामीण क्षेत्रातील अनेक व्यक्तींच्या जीवनाचा आढावा अशा स्तंभलेखनाद्वारे घेतला आहे. याविषयी द. ता. भोसले म्हणतात, ''बदलत्या खेड्यातील बदलत्या समस्यांचे, व्यक्ती, प्रसंग आणि घटनांच्या माध्यमातून ग्रामीण जीवनाचे चित्रण कमालीचे वास्तव, भेदक आणि व्याकूळ करणारे आहे. दु:ख, दैन्य आणि दारिद्र्य सर्वव्यापी आहे हे मनावर ठसले.'' अशाच प्रकारचे गंगाधर पानतावणे यांनी आपल्या ग्रंथामध्ये केलेले चित्रण वास्तव आणि मनावर ठसवणारे असे आहे.

## 'अर्थ आणि अन्वयार्थ' ग्रंथातील विविध घटनांचा परामर्श

गंगाधर पानतावणे यांनी आपल्या 'अर्थ आणि अन्वयार्थ' ग्रंथामध्ये विविध सामाजिक आणि वाङ्मयीन घटनांचा आढावा आपल्या ग्रंथामध्ये घेतलेला आहे. समाजामध्ये अनेक घटना घडत असतात. या घटना एवढ्या प्रभावशाली असतात की त्या घटनांविषयी सहज प्रतिक्रिया उमटली जाते. मग या सामाजिक, राजकीय, धार्मिक, स्त्रीविषयक, बालविवाह, चित्रपट, वाङ्मयीन अशा क्षेत्रामध्ये घडणाऱ्या घटनांची वैचारिक बाजू व लोकांच्या मानसिक व बौद्धिक विचारांची बाजू यांचा अर्थ आणि अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न गंगाधर पानतावणे यांनी केला आहे.

गंगाधर पानतावणे यांनी 'अर्थ आणि अन्वयार्थ' या ग्रंथामध्ये केलेले स्तंभलेखन हे सामाजिक प्रबोधन करणारे वैचारिक लेखन आहे. अशा प्रकारचे लेखन करत असताना घटनेच्या दोन्ही बाजुचा विचार करणे महत्त्वाचे असते. अशा प्रकारच्या स्तंभलेखनामध्ये समाजमनाचा विचार करणे फार महत्त्वाचे असते. कारण स्तंभातून दंभाचा स्फोट घडला की समाज स्तंभित होतो. हे विचारात घेऊनच अक्षरांचा, शब्दांचा, संवादाचा आणि भाषेचा वापर केला आहे. आणि त्याचबरोबर गंगाधर पानतावणे यांनी आपल्या 'अर्थ आणि अन्वयार्थ' ग्रंथाद्वारे लोकांना स्तंभलेखनाकडे अंतर्मुख करण्याचा प्रयत्न केला आहे.

गंगाधर पानतावणे यांनी आपल्या 'अर्थ आणि अन्वयार्थ' या ग्रंथाद्वारे समाजामध्ये घडणाऱ्या घटना समाजापुढे मांडण्याचा प्रयत्न ज्या प्रमाणे केला आहे. त्याचप्रमाणे समाजामध्ये राहणाऱ्या लोकांच्या मनाचा विचार करून त्यांची मने न दुखावता वेगवेगळया घडणाऱ्या घटनेतील सत्य समाजापुढे मांडण्याचा प्रयत्न त्यांनी आपल्या स्तंभलेखनाद्वारे केला आहे. सत्य असत्याची बाजू त्यांनी अगदी नकळतपणे मांडली आहे.

गंगाधर पानतावणे यांनी 'ब्रह्मं सत्यं जगन्मिथ्या!' या लेखामध्ये धार्मिक तत्त्वज्ञान सांगितले आहे. यामध्ये कोणतेही तत्त्वज्ञान गोंडस असते. म्हणूनच त्यावर माणसं लगेच विश्वास ठेवतात. भारावून जातात. कधी कधी वाटाही चुकवात पण ते शोधायचं कामही तत्त्वचिंतकच करतात. तत्त्वज्ञानाबद्दल व तत्त्वचिंतकाबद्दलही विनोबा म्हणतात, "मनुष्याची एक प्रकृती असते. एक संस्कृती असते आणि एक विकृती असते. मागीलांचे बोटे धरून चालत जाणं, तत्त्व प्रमाण मानणं आणि त्याला विज्ञानाचा वाराही लागू न देणं ही प्रकृती, विकृती आणि संस्कृतीच प्रस्फुरणे होत."

यामध्ये गंगाधर पानतावणे यांनी आठव्या शतकात केरळात जन्मलेल्या आदि शंकराचार्यांनीही एक तत्त्वज्ञान सांगितलं आणि कोट्यावधी माणसांनी ती आपली संस्कृतीच मानली. पण हे शंकराचार्यांना सहजासहजी जमले नाही. बत्तीस वर्षाचं आयुष्य लाभलेल्या शंकराचार्यांनी वेदान्ताचा अभ्यास केला. उपनिषदं वाचली. भगवद्गीतेवर भाष्य केलं. कुशाग्र बुद्धीच्या त्या भाष्यकारानं स्वतंत्र तत्त्वज्ञानाला जन्म दिला. 'ब्रह्मं सत्यं जगन्मिथ्या !'

शंकराचार्यांनी जे तत्त्वज्ञान सांगितले त्यात ब्रह्म हेच सत्य आहे बाकी सारे मिथ्या आहे. भ्रम आहे, माया आहे. जन्म मरण संसारिक दु:खे आहेत. वेदान्त हे प्रमाण आहे. नगण्य आहे आणि आदि शंकराचार्य आपलं तत्त्वज्ञान पेरित राहिले आणि मग त्यावेळी आदि शंकराचार्याविषयी एक कथा सांगितली जाऊ लागली. म्हणतात, ते एकदा रस्त्यानं जात असताना समोरुन एक महाकाय हत्ती आला. ते भांबावले त्यांना काय करावे कळेना. हत्ती आपल्याला चिरडून टाकेल या भयानं ते मागे पळत सुटले. तेव्हा लोक ओरडले, 'अहो आचार्य, आपण का पळता आपणच म्हणता ना 'ब्रह्मं सत्य जगन्मिथ्या'. केवळ ब्रह्म हेच सत्य आहे. बाकी सारे खोटे आहे. भ्रम आहे. मिथ्या आहे. तो हत्तीसुद्धा भ्रम आहे. मिथ्या आहे.' अशा प्रकारची कथा सांगितली जाते.

या लेखामध्ये गंगाधर पानतावणे यांनी आदि शंकराचार्यांच्या परंपरेतील कांची कोटी मटाचे जयेंद्र सरस्वती शंकराचार्य तसेच आदि शंकराचार्य यांना कोठडीत ठेवलं गेलं. त्यांनी कांची कोटी मंदिराचा कारभारी शंकर रामण यांची गुंडाकडून हत्या केली. यात शंकराचार्य सामील असतील. त्यांना अटक करण्याची हिम्मत कशी झाली. असे सरकारवर आरोप करण्यात आले. कोट्यावधी रुपयांचा गैरव्यवहार, अनेक संस्था चालवणे, काहींना आपल्या मार्गातून नामशेष करणे हे अट्टल गुन्हेगारांना जमेल पण शंकराचार्यसुद्धा असे सरकारला प्रश्न करण्यात आले. पण कायद्यापुढं सर्व समान. तेथे दुजाभाव नाही असे सांगण्यात आले. पण या तत्त्वज्ञानी लोकांची चालणारी आतील

कामे, त्यांच्याकडून स्त्रियांना दिली जाणारी वागणूक. पण या सर्व प्रकारावर लोक विश्वास ठेवत नाही. त्यांच्यातील अंधश्रद्धा कमी होत नाही म्हणूनच समुहामध्ये भूकंप झाला याचे कारण त्यांनी शंकराचार्यांना अटक झाली यामुळे झाले असे सांगितले. खरोखरच याविषयीचा अन्वयार्थ लावताना गंगाधर पानतावणे म्हणतात, जयेंद्र सरस्वतींनी आदि शंकराचार्यांचं तत्त्वज्ञान लोकांना सांगायला हवे. 'ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या', कोठडीत स्त्रियांची बेअब्रू, आर्थिक गैरव्यवहार, भाडोत्री गुंड सुपारी हे सर्व मिथ्या आहे. भ्रम आहे. अगदी त्या हत्तीसारखं ! यावरूनच असे लक्षात येते की समाजामध्ये अंधश्रद्धा ह्या फार मोठ्या प्रमाणात अजूनही दिसून येतात. त्यामुळेच आजही समाजामध्ये मोठ्या प्रमाणात प्रबोधन करण्याची गरज आहे.

तसेच गंगाधर पानतावणे यांनी 'हे चित्र ! आणि ते चित्र!' या लेखामध्ये समाजामध्ये अनेक वेगवेगळ्या घटना घडत असतात. पण समाजामध्ये त्याविषयीची उमटणारी प्रतिक्रिया त्याबद्दलचा साद प्रतिसाद कशाप्रकारे करतात हे गंगाधर पानतावणे यांनी आपल्या स्तंभलेखनामध्ये मांडले आहे. यामध्ये 'श्यामची आई' या चित्रपटाला जेव्हा राष्ट्रपतींचे सुवर्णपदक मिळाले तेव्हा मराठी माणसांना खूप आनंद झाला. या सुवर्णपदकामुळे महाराष्ट्राची मान उंचावली होती. त्यावेळी आचार्य अत्रे म्हणाले होते, 'गेल्या दहा वर्षात असा पराक्रम झाला नाही !' भारतीय चित्रपटसृष्टीत पुन्हा एकदा मराठी चित्रपटसृष्टीला अभिवादन केले. 'श्वास'लाही खूप वर्षानंतर राष्ट्रपतींचे सुवर्णपदक मिळालं. आचार्य अत्रे असते तर त्यांनी ललकारी दिली असती. 'गेल्या दहा वर्षात असा बोलपट झाला नाही.' आचार्यांचे कर्तृत्व अफाट आणि बोलणेही अफाट ! ते शब्दाचे स्वामी होते आणि अंतकरणाचे उदार होते. या चित्रपटामध्ये असणारी वनमालाबाईंची सात्विक आई कोण विसरणार आणि माधव वझेंचा लहानगा श्याम आणि 'श्वास' मधीला आजोबा आणि लहानगा नातू. कधी विसरता येणार नाही असे गंगाधर पानतावणे म्हणतात. श्वासच्या कथेने तर काळजालाच हात घातला. 'ऑस्कर' ला नामांकन झालं. जगाच्या नकाशावर 'श्वास'नं पाऊल ठेवलं पण ऑस्करसाठी जायचं म्हटल्यावर भक्कम अर्थबळही हवं. पैशाचा ओघ ही हवा. यासाठी वेगवेगळ्या क्षेत्रातील माणसं सहकार्याचा हात घेऊन आली. सामान्य माणसं शुभेच्छासह पुढे आली. अर्थबळही आलं. श्रीमंत सचिन तेंडुलकर नावाचा माणूस म्हणाला, 'माझी बॅट घ्या. लिलाव करा.' तेव्हा सचिन क्रिकेटवर प्रेम करणारा शाळकरी मुलगा म्हणजेच गंगाधर पानतावणे हसत हसत म्हणाले, "काका, सचिनं असं का केलं हो ! कोट्याधीश आहे ना तो ?' आम्ही तर आमचे साठवलेले खाऊचे पैसे

'श्वास'ला दिले. मी सुन्न झालो. म्हणालो, 'बेटा, मोठ्यांच्या मोठ्या गोष्टी असतात. लिलावासाठी बॅट दिली ना यालाही औदार्य म्हणतात.' मुलगा खळाळून हसला आपली लहानगी बॅट खांद्यावर घेऊन खेळायला निघून गेला.''

याचवेळी सुनामीचा हाहाकार झाला आणि मानवी तंत्रज्ञान आणि विज्ञानाच्या पलीकडचा प्रलय होता. मृत्यूनं थैमान घातलं होते. त्याने माणसांचा, माणसांच्या वस्तीचा आणि मानवी संबंधाचा, मुलं, बाया, अश्रद्ध-श्रद्ध असा भेदभाव केला नाही. क्षितिजापार भिडणारे समुद्राचे पाणी डोळे भरून पाहणाऱ्यांना समुद्रलाटा निर्विकारपणे आपल्याला कवेत घेतील असे स्वप्नातही वाटले नसेल. पण या सुनामीमुळे किती एकाचा वंश राहिला नाही. एकाकी मुलांनी कुणाच्या वाटेकडे बघावे? कुणाला हाक द्यावी ? उद्याची प्रकाशस्वप्ने पाहणाऱ्या किती एक तरुणाईचे देह निर्दयपणे विक्राळ लाटांनी ओढून नेले. सुनामी केवढे हे तुझे कौर्य ! पण याही वेळी सुनामीच्या दु:खाक्षणी ज्याप्रमाणे 'श्वास' च्या आनंदासाठी भरभरून सहकार्य दिले तसे सुनामीच्या दु:खाच्या क्षणी सहकार्याचा ओघ रुंदावला. शासन आणि स्वयंसेवी संस्थांनी पराकाष्ठा केली. धनिकांनी आणि कलावंतांनी कर्तव्याची आब राखली. डॉक्टर आणि सैनिकांनी डोळ्यात तेल घालून दु:खितांचे रक्षण केले. एड्सग्रस्त मुलांनी 'शुभं करोती' म्हणून प्रार्थना केल्या. लहान मुलांनी शेजारी पाजारी डबे फिरवून निधी जमवला आणि शासनाला दिला. हे दोन्ही चित्रे सुख-दु:खाची असली तरी सर्वांनी त्याला साथ दिली. भरभरून प्रतिसाद दिला. परंतु गंगाधर पानतावणे ते चित्र वेगळ्याच स्वरूपाचे समाजापुढे मांडले आहे.

ते चित्र ! म्हणजे एका निराधार मुलीवर पुरुषांनी बलात्कार केला. खरोखरच ही घटना माणुसकीला काळीमा फासणारी आहे आणि तेही आश्रयसदनिकेमध्ये आश्रयास ठेवलेल्या मुलीवर खरोखर या घटनेवरून अध:पतनाला मर्यादा नसतात हेच खरे. सहकार्याचा ओघ पण तेथे जात आणि धर्म. हिंदू संघटना आणि हिंदूंच्या वसाहतीकडे मदतीची वाहनं. पण गंगाधर पानतावणे म्हणतात तेच खरे. मरणाला जात आणि धर्म माहीत नाही. पण अमानुषीकरणाला मात्र जात आणि धर्म असते. परंतु सुनामीला यापैकी काहीच माहीत नव्हते. प्रत्येक घटनेविषयी समाजामध्ये येणारी प्रतिक्रिया खरोखर वेगळी असते. याची जाणीव करून देण्याचे काम गंगाधर पानतावणे यांनी केले आहे. म्हणूनच गंगाधर पानतावणे म्हणतात - मनू ! तू अमर आहेस.

गंगाधर पानतावणे यांनी आपल्या स्तंभलेखनामध्ये प्रत्येक घटनेचा सारासार विचार केला आहे. यामध्ये मग ती समाजातील घटना असो वा ती आपल्या देशाची राज्यघटना असो. गंगाधर पानतावणे यांनी प्रत्येक गोष्ट अगदी सूक्ष्मतेने मांडण्याचा प्रयत्न स्तंभलेखनाद्वारे 'अर्थ आणि अन्वयार्थ' या ग्रंथामध्ये केला आहे. प्रसिद्ध नाटककार विजय तेंडुलकर एक मनस्वी लेखक. गंगाधर पानतावणे त्यांच्याबद्दल म्हणतात माणसातील हिंस्त्रतेचा, माणसातील दुबळेपणाचा आणि माणसातील परप्रकाशिततेचा त्यांनी नेहमीच विचार केला. विकृती, मग ती माणसातील असेल नाही तर राजकारणातील; त्याविरुद्ध तेंडुलकर उसळून उभे राहिले. व्यथित झाले. त्यांचे मन प्रसंगी आक्रमकही झाले. जिथे जिथे अनाचार, आक्रंदन, अनैतिकता त्यांनी पाहिली, अनुभवली त्याविरुद्ध त्यांनी शब्दशस्त्र उगारले. पण नंतर ते अंतर्मुखही झाले आणि दिङ्मूढही. परवा सहकार महर्षी मोहिते पाटील प्रतिष्ठानचा पुरस्कार स्वीकारताना त्यांचं अस्वस्थ मन उन्मळून आले. ते म्हणाले, आता जगणे फार झाले. त्यापेक्षा मरण आलेले बरे ! त्यांच्या तोंडून हताश शब्द बाहेर पडण्याचे कारण तेंडुलकर म्हणाले, घटनाकारांनी घटना निस्पृह भावनेने लिहिली. देशाला नवी दिशा दिली. परंतु राज्यघटनेनं दिलेल्या लोकशाहीचं काय झालं ? राजकारण्यांनी माणसांची मुद्रा मलीन करून टाकली. याचे कारण म्हणजे खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण नवा पेहराव घेऊन आले आणि देशात प्रचंड उलथापालथ झाली. यामुळे तेंडुलकर अस्वस्थ झाले. भारतातल्या राजकारणानं देशाचं काय झालं ? संचित तेंडुलकांना वाटले असेल आज कुठे असेल घटनाकाराची राज्यघटना ? म्हणूनच ते म्हणाले, 'राज्यघटनेचा पुनर्विचार करण्याची वेळ आली आहे.'

तेंडुलकरांच्या राज्यघटनेचा पुनर्विचार करून समग्र देश बनेल का ? वंचिताचे सारे प्रश्न सुटतील का ? नव्या पिढीचे प्रश्न सुटतील का ? स्वातंत्र्यापूर्वी पाहिलेली स्वप्न साकार होतील का? तेंडुलकर तुमच्या मनातील घुसमट राज्यघटनेच्या पुनर्विचारात शमेल का ? असे प्रश्न गंगाधर पानतावणे यांनी उभे केले आहेत. तेंडुलकरांच्या वाक्याचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न गंगाधर पानतावणे यांनी केला आहे.

गंगाधर पानतावणे यांनी विजय तेंडुलकरांना आपली राज्यघटना कशी चांगली आहे हे सांगण्याचा प्रयत्न केला आहे. याबद्दल राष्ट्रपती के. आर. नारायण म्हणाले होते, 'भारतीय राज्यघटना ही काळाच्या कसोटीवर उतरली आहे. त्यामुळे घटनेचा फेरविचार करण्यापूर्वी घटना यशस्वी ठरली आहे की ती राबविण्यात आपण अयशस्वी ठरलो, याचं परीक्षण करायला हवं.' गंगाधर पानतावणे

म्हणतात, 'आपली राज्यघटना खरोखरच चांगली आहे. परंतु त्यामध्ये कोणतेही बदल होत नाही. विकास वाटांच स्वरूप बदललंय पण त्यासाठी राज्यघटना बदलण्याची गरज नाही. जर असे केले तर राज्यघटनेला सुरुंग लावण्यासारखे आणि एकाधिकारशाही प्रस्थापित करणाऱ्या उजव्या राजकारण्यांची इच्छापूर्ती होईल.' असे गंगाधर पानतावणे विजय तेंडुलकरांना सांगतात.

गंगाधर पानतावणे यांनी 'संमेलनाचे सूप वाजले !' या लेखामध्ये एकाच वेळी अखिल भारतीय साहित्य संमेलन आणि नाट्यसंमेलन भरल्यामुळे जो गोंधळ उडालेला आहे त्याचे चित्रण केले आहे. साहित्यसंमेलन नाशिक येथे लढ, राजकारण, साहित्य, कुसुमाग्रज, सावरकर, दादासाहेब गायकवाड, वामनराव कर्डक, बाबूराव बागूल यांचा परिसर आणि डोंबिवली तर उच्चभ्रू संस्कृतीचं माहेरघर. येथे पु. भा. भावे, शं. ना. नवरे, बाळशास्त्री हरदास आणि नाट्यचळवळीचं गाव. नाशिकला अध्यक्षस्थानी केशव मेश्राम तर नाट्यसंमेलनास सुरेश खरे होते. दोन्हीकडे उद्‌घाटक शरद पवार होते. कोणी म्हणाले एखाद्याला किती त्रास द्यायचा तर लगेच कोणीतरी म्हणाले आपण रोज रोज जेवतोच की नाही. त्याचा कंटाळा येतो का ? तेव्हा इकडं शरदराव-विलासराव तर तिकडं अमिताभ-मिथुन.

नाशिकला उद्‌घाटन झाले पण साहित्यसंमेलनाच्या उद्‌घाटनासाठी मात्र बोकडाचा बळी दिला. चॅनेलवरून भोजनावळीच्या पंक्ती व गजर पाहता आला. संमेलन अध्यक्षांनी मात्र गप्प बसायचे सोडून ते म्हणाले, ''बोकडाला बळी देण्यात गैर काय आहे ? देवाधर्माला चालते, रूढी परंपरेला चालते तर संयोजकांनी केले तर बिघडले कुठे ?'' कुणी म्हणाले खंडोबाची शांती करावीच लागते. कुणी म्हणाले बाहेरुन मटण आणून ताटात ठेवले. त्यावर स्वागताध्यक्ष म्हणाले, ''अगा जे घडिलेची नाही । त्याची वार्ता काई ।' असे अनेक साहित्यसंमेलनाविषयी तर्कवितर्क करण्यात आले.

तर तिकडे नाट्यसंमेलनास पाचशे रुपयाच्या प्रवेश पत्रिका दोनशे रुपयास केल्या तर कुणी अमिताभ बच्चन येणार आहे म्हटल्यावर पावत्या हातोहात जातील असा समज करून आपले कलाकौशल्य पणाला लावले व अशा रीतीने दोन्ही उद्‌घाटने लक्षात राहण्यासारखी झाली.

इकडे नाट्यसंमेलनाला कुणी म्हणाले अमिताभ रावांनी काम केले तर ते ही नाटकात आणि बोलपटात करावे. तर सिनेमासृष्टीला चांगले दिवस येतील. साहित्यसंमेलनात मेश्रामांनी जोरदार भाषण केले. त्यांनी मुंबई कुणाची हा प्रश्न पुन्हा उभा केला. यामध्ये मेश्रामांनी अनेक प्रश्न

हाताळले. त्यात जागतिकीकरण, देशवासीयांची मानसिकता, मराठी भाषेचे भवितव्य, सामाजिक पुर्नबांधणी असे अनेक प्रश्नावर बोलले.

नाट्यसंमेलनात, सुखदु:खाची मांडणी गंभीरपणे करत होते. शरदरावजी आणि अमिताभ यांचे हितगूज जोरात चालले होते. अचानक शरदरावजी उठले गोंधळ निर्माण झाला. संमेलनाध्यक्षांना आवरतं घ्यावं लागले. तेव्हा तावातावाने म्हणाले ही काय रीत झाली ?

अशाप्रकारे गंगाधर पानतावणे यांनी दोन्ही संमेलने एकाच वेळी भरल्यामुळे त्यांचे कसे सुप वाजले, गोंधळ कसा उडाला याचे वर्णन केले आहे. यामध्ये मात्र पोलिसांनी कसोशीने प्रयत्न केले व दोन्ही साहित्य संमेलने संपली आणि त्यांना फुरसत मिळाली.

गंगाधर पानतावणे यांनी अनेक वेगवेगळ्या घटनांचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न आपल्या 'अर्थ आणि अन्वयार्थ' या ग्रंथामध्ये केला आहे. अशाच प्रकारे 'शिस्त म्हणजे शिस्त' या लेखामध्ये माणसाच्या मनावर आणि वर्तनावर नियंत्रण ठेवते ती शिस्त. बेशिस्त, बहिणाबाईच्या पिकावर पुन्हा पुन्हा जाणाऱ्या गुरासारखी असते. हे बहिणाबाईचे दिलेले उदाहरण समर्पक असे आहे. सैन्यातील शिस्तीबद्दलही सर्व मोठ्या अधिकाऱ्यांपुढं आदबीनं वागायचे. नेमलेली काम करायची. सीमेवरच्या सैनिकांना तर रात्रंदिवस युद्धाचा प्रसंग असतो. ऊन, वारा, पाऊस बघायचा नाही. कर्तव्याला जागणं हाच जीवनाचा अर्थ.

गंगाधर पानतावणे शिस्तीच्या बाबतीत ग्रंथांनाही विसरले नाहीत. विद्वानांच्या अभ्यासिकेतील ग्रंथ शिस्तीत लावलेले असतात ! मग ते पंडित मदन मोहन मालवीय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, बॅरिस्टर एम. आर. जयकर, हरिसिंग गैर यांची ग्रंथालये भल्याभल्यांना आश्चर्यचकित करणारे. या सर्व लोकांनी अगदी मुलासारखं प्रेम केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ग्रंथालयाविषयी ते सांगताना म्हणतात. शा. शं. रंगे सांगत, कितीतरी विषयांवरील पुस्तके, कायद्यातील पुस्तकं एका रांगेत, जगातील वेगवेगळ्या देशाच्या घटना एका रांगेत. धर्म, समाज, संस्कृती, इतिहास, वाङ्मय यांच्या रांगा ठरलेल्या. पुष्कळदा ते सेवकाला म्हणायचे ते बघ. अमुक अमुक कपाटातल्या तिसऱ्या रकान्यातल्या शेवटी अमुक अमुक रंगाचं पुस्तक आहे, ते घेऊन ये. सेवक पुस्तक न चुकता आणायचा.'

गुरुकुलातील शिस्तीविषयी सांगताना ते म्हणतात, एखाद्या पालकांनी गुरुकुलात आणून सोडले की धर्माभ्यास, आश्रमाची कामे, गुरूची आणि गुरूमातेची आज्ञा, कायम गुरूची सेवा करणे होय.

गुरुकुलातील गोष्ट सांगताना गंगाधर पानतावणे सांगतात - गुरुंचे दोन लाडके सेवक गुरुंची अखंड सेवा करीत होते. एकाने एका पायाची व दुसऱ्याने दुसऱ्या पायाची सेवा करायची. दोघांचही अगदी व्यवस्थित चाललं होतं. पण अचानक दोघांच बिघडलं. ते दोघेजण मुकाट्यानं सेवा करायचे. कुणी कुणाकडे बघायचं नाही की बोलायचे नाही. एका शिष्याला घराकडून बोलावणे आले आणि तो घरी गेला. गुरुने दुसऱ्या शिष्याला दोन्ही पायाची सेवा करण्याची आज्ञा दिली. दुसऱ्याने गुरुचा दुसरा पाय मुरगळला. दुसरा शिष्य माघारी, पहिला गेला त्यालाही या दुसऱ्यापायाची सेवा करण्यास सांगितले. तेव्हा त्यानेही तो पाय मुरगळला. या घटनेमुळे दोन्ही पाय दुखावले गेले.

तसेच एका शिस्तप्रिय शाळेमध्ये एका दहावीच्या विद्यार्थिनीने शाळेचा नियम मोडला. म्हणून निषेध करण्यासाठी शिक्षकांनी, पालकांनी रास्ता रोको आंदोलन केले. त्यावर प्राचार्यांनी त्या मुलीची चूक दाखवून दिली. विद्यार्थी, शिक्षक, पालकांनी प्राचार्यांची माफी मागितली व प्राचार्यांनी हे प्रकरण शांतपणे हाताळले. शिस्तीचे दूरगामी परिणाम हवेच असतात. दुष्परिणामांना वेळीच थोपवावं लागतं. जरब हवी असते.

अशा तऱ्हेने गंगाधर पानतावणे यांनी शिस्त ही चांगलीच असते. पण या शिस्तीचे दुष्परिणाम ही होऊ शकतात. हे वरील घटनांवरून अन्वयार्थ लावला आहे. विविध घटनेचे परिणाम, दुष्परिणाम समाजापुढे मांडण्याचा प्रयत्न गंगाधर पानतावणे यांनी 'अर्थ आणि अन्वयार्थ' या ग्रंथाद्वारे केला आहे.

राजकीय क्षेत्रात घडणाऱ्या घटनांचा आढावाही गंगाधर पानतावणे यांनी वेळोवेळी घेतला आहे. त्यांनी अनेक घटनांचे सत्य समाजापुढे लोकांपुढे, मांडण्याचा प्रयत्न केला आहे. भारत आणि अमेरिका यांचे संबंध चांगले आहेत. भारतातील साम्यवाद्यांनी नाके मुरडली. कारण अमेरिका हा भांडवली देश. तरीही राजकीय पातळीवर काही संबंध प्रस्थापित करावेच लागतात. चीन, रशिया, पाकिस्तान यांच्याशी ही भारताने राज्कीय पातळीवर संबंध प्रस्थापित केले होते.

पण अचानक घटना घडली आणि अमेरिकेतील आशियाई अमेरिका हॉटेल मालक संघटनेने मोदींची पावलं अमेरिकेला लागावित म्हणून निमंत्रण दिले होते. पण अमेरिकेने गुजरातचे नरेंद्र मोदी यांचा व्हिसा नाकारला. अमेरिकेचे भारताशी एवढे चांगले संबंध असतानाही मोदींना केनेडी विमानतळावर पाये ठेवू द्यायचा नाही असे ठरवलं. यावर आदळाआपट झाली. दंगल झाली. पण अमेरिका आपल्या निर्णयावर ठाम राहिली. पण अमेरिकेचे राजदूत डेव्हिड मलफोर्ड म्हणाले निर्णय

म्हणजे निर्णय ! पण व्हिसा नाकारण्याचे कारण एकच होते. २००२ मध्ये गुजरातमध्ये दंगल झाली. फार मोठ्या प्रमाणात मानवहानी झाली. गुजरातमधील जनतेचे जीवन सुरक्षित ठेवण्यात मोदींना अपयश आले. गुजरातीलमधील भीषण दंगल मोदींना थोपविता आली नाही. अमेरिकेने व्हिसा नाकारला. मोदी म्हणाले, ' भारताची प्रतिमा शलबलित करण्याचा हा घाट आहे. दंगलीविषयी चुकीची माहिती पसरवली जात आहे. व्हिसा नाकारल्याचा आपल्याला खेद नाही. पण अमेरिका एवढा श्रीमंत लढाऊ देश. त्यांनी घाबरुन तर मोदींचा व्हिसा नाकारला नसेल. पण गुजरातच्या बीजेपीच्या आमदारांच्या चेहऱ्यावर मात्र आनंदोत्सव.'

गुजरातमध्ये फार मोठ्या प्रमाणात हल्लाकल्लोळ झाला. काही संतप्त लोक म्हणाले मोदीच या कत्तलीचे जनक आहेत. वाजपेयी पहिल्यांदा हादरुन म्हणालेत ना 'मोदींनी राजधर्म पाळला नाही.' अडवाणी सुद्धा म्हणाले, 'गुजरातच्या दंगली वाजपेयी सरकारच्या कारकिर्दीवरील काळा डाग आहे.' किती एक निरपराध माणसं प्राणाला मुकली. चौकशी आयोग नेमले गेले. पण आयोगाच्या चौकशी विषयी एक राजकीय पक्ष म्हणाला, 'स्थानिक मुसलमानांनी कट रचून डब्याला आग लावली आणि पुढे नको ते घडलं.'गोध्रापूर्वीही तिथं जातीय दंगली होत होत्या. जाळपोळी व्हायच्या. पुष्कळदा सरकार बघ्याची भूमिका घ्यायचं पण सर्वोच्च न्यायालयानेसुद्धा म्हटलं की, नरेंद्र मोदींच्या हालचाली संशयास्पद आणि प्रक्षोभक होत्या. नरेंद्र मोदींविषयी निवडणुका जिंकल्यावर लोक म्हणू लागले. पण उशीरानंतर के. आर. नारायण यांनी 'मानव संस्कृती' या मल्याळम मासिकाला आपल्या संवेदना व्यक्त केल्या. ते म्हणाले, 'गुजरात दंगलीचं कटकारस्थान वाजपेयी-मोदींचंच.'

पण मागेच राष्ट्रपती बोलले असते तर सारा देश राष्ट्रपतींच्या पुढे नतमस्तक झाला असता. लोकांनी त्यांना अभिवादन केले असते कारण देशातील लोक राष्ट्रपतींना 'रबर स्टॅम्प' म्हणाले तसे म्हणाले नसते. गोध्रानंतर उसळलेल्या दंगलीवरच्या परिणामकारक उपाययोजनासंबंधी पंतप्रधान वाजपेयींना वारंवार सांगितलं, पत्र दिली. मिलिटरीकडे सूत्र दिली असती तर मनुष्य हानी टळेल असही सांगितलं. पण वाजपेयींनी ते ऐकलं नाही. दुर्लक्ष केले. 'पण गुजरात दंगल वाजपेयी मोदींच कटकारस्थान' म्हणालात ? हा इतिहास देशाला कळला हे बरंच झालं. पण खूप उशीर झाला. नारायण साहेब आपण प्रसंगी वेळीच या पदाचा त्याग करण्याची सिद्धता केली असती तर देशाने पुन्हा एकदा म्हटल असतं, आमच्या देशाचा राष्ट्रपती 'रबर स्टॅम्प नाही.' असे गंगाधर पानतावणे यांनी आपल्या स्तंभलेखनामध्ये म्हटले आहे आणि ते खरोखरच आहे.

गंगाधर पानतावणे यांनी आपल्या स्तंभलेखनाच्या साहाय्याने अनेक गोष्टी उघडकीस आणण्याचा प्रयत्न केला आहे. जे सत्य आहे ते शोधून अनेक दाखले व उदाहरणे देऊन हे सत्य त्यांनी मांडले आहे. प्रत्येक घटनेची सिद्धता त्यांनी मांडलेली आहे.

गंगाधर पानतावणे यांनी विद्यार्थ्यांचे लहान मुलांचेही प्रश्न आपल्या लेखनाद्वारे मांडलेले आहे. त्यांचे प्रश्न कोण समजून घेणार. त्यांचा विचार कोण करणार ? त्याचाही विचार गंगाधर पानतावणे यांनी आपल्या 'अर्थ आणि अन्वयार्थ' या ग्रंथामध्ये केलेला आहे.

**जे सत्य ते बघुनिया मज वेड लागे।**
**गाणे मनात मग होय सर्वेचि जागे॥**

अशा निर्मळ अभिव्यक्ती करणाऱ्या, गुलाबाची कळी पाहून हरखून गेलेल्या, एवढंच नाही तर फुलांची पखरण पाहून

**टिप फुले टिप । माझे गडे ग।**
**टिप फुले टिप । पहा फुलांची पाखरण झिप॥**

असे म्हणून आनंदून गेलेल्या आणि सुंदर सकाळ पाहून 'किती सकाळ ही सुंदर .... जसे मुलींचे माहेर' अशी भावसुंदरता व्यक्त करणाऱ्या केशवसुतांनी समाजातील दुष्ट वृत्तीवरही तितकेच कठोर प्रहार केले आहेत. केशवसुतांनी अशा बंधनावर आणि निर्घुणतेवर आसूड ओढणारे विचार प्रकट केले आहेत.

त्याचप्रमाणे लहान मुलांची छळवणूक करणाऱ्यांचा त्यांचा संताप क्षोभ अनावर होतो. केशवसुतांची 'मुलास झोडपणाऱ्या पंतोजीस' या कवितेत तर त्यांनी शिक्षकांचा निषेध केला आहे. लहान मुलांचा, लहान लहान विद्यार्थ्यांचा का छळ केला जातो. शिक्षक म्हणजे शिकविणारा की शिक्षा देणारा ? ती शिक्षा मुलं आज्ञाधारकपणे स्वीकारतातही. आपल्या चुकांवरच ते पांघरुण नसतं तर आपल्या भल्यासाठी दाखवलेली दिशा असते. म्हणून राजकारण्यांना सुद्धा शिक्षा देण्याचा परवाना दिला आहे काय ? असा प्रश्न गंगाधर पानतावणे यांनी केला आहे.

माणसांना राबवणं हे त्यांच्या अंगवळणीच पडलेले आहे. हे राजकारणी अचानक गांधीजींच्या विचारांनी भारावून गेले. कारण कानपूरला अशीच एक घटना घडली की त्यांनी गांधीजींची जयंती साजरी करण्याचा फतवाच काढला. शिक्षकांची धांदल उडाली. शाळा जाग्या झाल्या. मुलामुलींना हुरुप आला. त्यांनी फर्मान काढले. शाळांतल्या दहा हजार मुलामुलींना बोलवायचं आणि गांधीजींची

भजन त्यांच्याकडून म्हणून घ्यायची. सर्व तयारी झाली. मंत्री वगैरे वेळेवर आले. कार्यक्रम सुंदर प्रकारे पार पडला.

हा कार्यक्रम महाराष्ट्रानं पाहिला आणि कानपुरसारखा कार्यक्रम करायचं ठरवलं. गांधी जयंती साजरी करायची ठरवली. या कार्यक्रमासाठी उद्योगपती खासदार अमरसिंग आणि विख्यात अभिनेत्री खासदार जयाप्रदा यांना बोलावले होते. पण कार्यक्रम एकीकडे आणि हे दोघेजण दिल्लीत रेंगाळत होते. अकरा वाजून गेले तरी नेत्यांचा पत्ता नाही. ऑक्टोबर महिन्याचा उष्मा आणि मग उन्हाच्या तडाख्यानं लहान मुल-मुली जमिनीवर कोसळू लागली. अमरसिंग आणि जयाप्रदावर बोलणे चालू झाले. चाळीस मुलं कोसळली होती. सगळ्यांच्या नजरा विमानावर होत्या. मुर्च्छित विद्यार्थ्यांना रुग्णालयात नेले जाऊ लागले. रुग्णालयात पालकांचा आक्रोश होऊ लागला.

खरोखर गांधी जयंतीच आहे ना एवढं सगळं पाहून त्यांना परपीडा देणाऱ्यांना त्यांनी काय म्हटलं असतं. नुसतेच अश्रू डोळ्यात तरळत होते. एक वाजला आणि पाहुण्यांच अवकाशयान आले. हे उद्याचे भावी इंजिनिअर, डॉक्टर खाली कोसळताना नेते पहात होते. रुग्णवाहिकांचे सायन वाजत होते. वरुन आयोजक शेतकरी आणि विद्यार्थ्यांची तुलना करतात. अशा या निर्लज्जपणाला गंगाधर पानतावणे म्हणतात काय उत्तर देणार.

स्वातंत्र्यपूर्व काळात किंवा स्वातंत्र्योत्तर काळात ज्याप्रमाणे स्त्रियांवरील अन्यायाविरुद्ध अनेक लोकांनी, समाजसुधारकांनी आवाज उठवला, त्यांचे प्रश्न समाजापुढे मांडले. त्यांच्यामध्ये समाजप्रबोधन करण्याचे काम केले. त्यांच्या शिक्षणासाठी प्रयत्न केले गले. त्याचप्रकारे स्त्रियांचे प्रश्न समाजापुढे मांडण्याचे काम गंगाधर पानतावणे यांनी केले आहे. हे सर्व त्यांनी आपल्या स्तंभलेखनाद्वारे आणि 'अर्थ आणि अन्वयार्थ' ग्रंथाद्वारे समाजापुढे मांडण्याचे काम केले आहे. रेव्हरंड नारायण वामन टिळक यांच्या कवितेचे शीर्षक त्यांनी आपल्या लेखाला दिले आहे. ते म्हणजे 'केवढे हे क्रौर्य !' यामध्ये टिळकांनी जसे जखमी पक्षिणीला जसे जीवनदान दिले आहे. त्याचप्रमाणे गंगाधर पानतावणे यांनी स्त्रियांच्या प्रश्नाला जीवनदान देण्याचे काम केले आहे.

यामध्ये गंगाधर पानतावणे यांनी स्त्रियांच्या प्रश्नातून त्यांचे दुःख मांडण्याचा प्रयत्न केला आहे. यामध्ये त्यांनी बालविवाहाला प्रतिबंध करणाऱ्या आणि अनेक श्रद्धा आणि अंधश्रद्धा यांना विरोध करणाऱ्या शकुंतला वर्मा नावाच्या स्त्रीवर दुष्ट लोकांनी तिच्या हातावर तलवारीने घाव केले. अशा या हृदय पिळवटून टाकणाऱ्या घटनेविषयी गंगाधर पानतावणे म्हणतात, ''शासनाच्या

कायद्याचं पालन व्हावं यासाठी अधिकारी म्हणून गावोगाव जागरण करणं हा काय गुन्हा ? सती प्रथेला आजही गोंजारावं, बालविवाहासारख्या अनिष्ट रूढी प्राणपणानं जपणं यालाच भारत म्हणायचं का ? शकुंतलाबाई इंदूरच्या इस्पितळात हे सारं आठवून किती कष्टी होत असतील ! पण बालविवाह हा आमचा धर्म आहे आणि त्याचे पालन आम्ही करणार म्हणून एकविसाव्या शतकातही अज्ञानाचा झेंडा फडकवित ठेवणारे, आपली प्राचीन परंपरा कवटाळून आरोग्य शास्त्राचा आणि विज्ञानशास्त्राचा पराभव करतात म्हणायचं."

अगदी पूर्वीपासूनच बालविवाह करण्याची पद्धत होती आणि त्या पद्धतींना विरोध दर्शविणे म्हणजे फार मोठे धाडस हवे होते. अगदी जीर्ण रूढी व परंपरापासून बाल विवाह पद्धती चालू झाल्या आणि त्या अजूनही आहेत. मग त्या लवकर बंद होणे शक्य नव्हते. मग या बालविवाह पद्धतीमध्ये पंचवीस वर्षाच्या माणसाने पाच वर्षाच्या मुलीबरोबर विवाह करणे म्हणजे अधिक चांगले समजले जात होते. एवढेच नव्हे तर गरोदर स्त्रीच्या गर्भावर कुंकवाचा टिळा लावून कुंकुमविवाह ही होत होता. एवढ्या जीर्ण झालेल्या पद्धतीला नवीन समाज सुधारकांनी विरोध करायचा म्हटले तरी शक्य नव्हते.

महामहोपाध्याय पां. वा. काणे म्हणाले की अल्पवयीन मुलींचे विवाह होत होते तेव्हा त्या विवाहांचे स्वरूप केवळ संस्कारांचे होते. असं असलं तरी बालविवाहांनी प्रचंड हानी झाली. सुधारकांनी याला प्रचंड विरोध केला याचं कारण तरी काय होतं ? समज नसलेल्या वयातील शरीरसंबंध. शारीरिक क्षय आणि अटळ मृत्यू यामुळे अर्ध्या ताटावरून उठून जाणाऱ्यांची संख्या काय कमी होती. आणि म्हणूनच अनैसर्गिक विवाहाला लोकहितवादी, जोतिबा फुले, आगरकर यांनी विरोध केला. समाजाच्या मानसिकतेत बदल व्हावा यासाठी पराकाष्ठा होती. म्हणूनच समाजसुधारकांनी वाढत्या वयातील विवाहाचा, पुनर्विवाहाचा पुरस्कार केला. ब्रिटिश सरकारनं वाढत्या वयातील विवाहासाठी संमति वयाचा कायदा आणला. पण सनातन्यांना प्रचंड विरोध केला.

अशाप्रकारे अनेक लेखामधून, कृतीमधून, वृत्तपत्राद्वारे, नियतकालिकाद्वारे, अनेक पुस्तक रुपाने समाजसुधारकांनी समाजप्रबोधन केले. याविषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, 'अल्पवयीन विवाहपद्धती घातक आहे. विपरित आहे. बालविवाहामुळे स्त्रीपुरुषांचे चारित्र्य शाबूत राहते ही खुळचट कल्पना आहे. त्यामुळे शोधक बुद्धीला ग्रहण लागले आहे. हिंदू समाज तेजोहीन बनत चाललेला आहे. पण त्याही पेक्षा देशाचे प्रचंड नुकसान झाले आहे. या रूढी अशास्त्रीय

आहेत. बालविवाह पद्धती नष्ट होणे त्यांनी अपरिहार्य मानले आहे.' बालविवाहांची चर्चा करताना तेच म्हणतात, 'ज्याप्रमाणे जोरदार वृक्ष व्हावयाचा असल्यास त्याचा जोरदार अंकुर असावा लागतो, त्याचप्रमाणे देशात सुदृढ संतती निपजण्यास प्रजोत्पन्नकाले असावा लागतो, त्याप्रमाणे देशात सुदृढ संतती निपजण्यास प्रजोत्पन्नकाली स्त्री-पुरुषांची वाढ झाली असली पाहिजे. दहा-बारा वर्षाच्या बालकाचे लग्न करून त्यांच्याकडून ज्या देशात प्रजोत्पादन करण्यात येते, त्या देशातील प्रजा खुरटी, अल्पायुषी, निस्तेज, दुर्बल व निरुत्साही झाली नाही तर कशी होणार ? जेथे शरीर सामर्थ्यांचा लोप होतो तेथे मानसिक सामर्थ्याचा लोप झाला तर त्यात नवल काय ?'

त्यामुळेच अनेक समाजसुधारकांनी या बालविवाह विरोधी एवढे प्रयत्न करुन समाज-सुधारकांच्या विचारांचा समाजमनावर खरोखरच काही प्रभाव राहिलेला आहे आणि त्यामुळेच काही बदलही जाणवतात. विज्ञान आणि शिक्षणानं विवाहासंबंधी विचारांना चालना दिली आहे. पण आपला देश खरोखरच जीर्ण आणि रुढी परंपरांचा देश आहे. याचा अन्वयार्थ मांडणारे लोक बालविवाहाचे समर्थन करीत. बालविवाहाला 'पुण्य' मानणाऱ्या आणि हाच खरा 'धर्म' आहे. असे म्हणणाऱ्या देशातील माणसं चंद्रावर गेली तर तिथंही बालविवाह घडवून आणतील. म्हणूनच धर्मगुरुंनी, समाजसुधारकांनी, मठाधिपतींनी वाईट चालीरीती मोडून काढण्यासाठी पुढे सरसावले पाहिजे.

गंगाधर पानतावणे यांनी वेळोवेळी आपल्याला जाणवलेले स्त्रियांविषयीचे प्रश्न, बालविवाहाविषयीचे कायदे या सर्व घटना त्यांनी आपल्या लेखाद्वारे समाजापुढे मांडण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. असाच एकदा बालविवाहा संबंधी 'दिल्ली हायकोर्टाचा निर्णय' मिळाला आणि दिल्ली हायकोर्टानं पंधराव्या वर्षी मुलीचे लग्न करणं योग्यच आहे असा निर्णय दिला आणि या देशातील बालविवाह प्रतिबंध कायदा मोडीत काढला. पण या कायद्यामुळे समाजामध्ये संतप्त लाट उसळली. अनेक महिला वर्गानी विरोध दर्शविला. त्याही पुढे जाऊन हायकोर्टाने दुसरा एक निर्णय घेतला आणि तो म्हणजे पंधराव्या वर्षी मुलींनी राजीखुषीने विवाह केला, तर त्याला कायद्यानं मान्यता द्यावी. पण याचे भयंकर परिणाम होतील हे कायद्याला कळालेच नाही. या निर्णयामुळे जातिजातीत नि धर्माधर्मातसुद्धा संघर्ष उद्‌भवतील हे कायद्याच्या लक्षातच आले नव्हते. काहीवेळा पुरोहित मुलींवर अन्याय आणि मुली त्या लहान वयातच सहन करीत होत्या. अगदी वाईट परिणाम होत. खेळण्या बागडण्याच्या वयात मुली आया होत. स्वतःच्या मुलांना सांभाळात. बालविवाहाच्या

रुढीमुळे या मुली सासवा होत. तेव्हा त्यांच वय लहान असायचं. त्या कोवळ्या वयात मुलींचा विवाह जठरांशी वा पोक्त विधुरांशी झाला, तर त्यांचा वणवाच व्हायचा. आई बाप विवश असत. धर्मशास्त्रांची, पुरोहितांची आणि समाजाची भीती सर्वांना असे. या अन्यायाविरुद्ध लोकहितवादी, आगरकर, लोकमान्य टिळक अशा अनेक समाजसुधारकांनी आपल्या लेखणीने बालविवाहाविरुद्ध आवाज उठवला. समाजामध्ये वृत्तपत्रातून समाजप्रबोधनाचे काम केले.

परंतु आता एकोणिसावं शतक बालविवाहाच्या प्रश्नांनी उलटून गेलं होतं. या प्रथेने समाजाचा आणि राष्ट्राचा विध्वंस केला. अशी सर्वच समाजसुधारकांची धारणा होती. काही दूरदृष्टीच्या वृत्तपत्रांनाही विघातक आणि अनिष्ठ रुढींचा कठोर परामर्श घेतला. सारे वातावरण ढवळून निघालं. लोकहितवादींनी सांगितलं 'शास्त्रे हे कायदे आहेत व ते अनहितकारक कायेदे असतील, तर ते नाकारल्यास चिंता नाही. समाजालाही सुधारणांची गरज वाटू लागली.' सनातनी आणि सुधारकांची झडप होऊ लागली. हिंदू धर्मशास्त्राचे गाढे अभ्यासक डॉ. भांडारकर म्हणाले, "जुन्या लोकांची पर्वा न करता इष्ट सुधारणांकरिता शपथा घेऊन त्या प्रीत्यर्थ छळ सोसण्यास सर्व हिंदुस्थानभर समंजस लोकांकडून अनुकरण होऊ लागले. तेव्हाच सुधारणा अमंलात येण्याची आशा आहे."

परंतु आगरकरांनी मात्र भारताच भविष्यच नि:शंकपणे आपल्या विचारांनी मांडले आणि ते म्हणजे मुलींची लग्ने चौदा-पंधरा वर्षाच्या पुढे व्हायला हवीत. हे व्हायचे असेल तर आम्ही धर्मबंधनाकडे दुर्लक्ष करण्यास सिद्ध असले पाहिजे. आगरकरांच्या डोळ्यांपुढे स्वतंत्र भारताचं आणि भारताच्या भवितव्याचं चित्र होतं.

गंगाधर पानतावणे यांनी आपल्या 'अर्थ आणि अन्वयार्थ' या ग्रंथामधून समाजामध्ये हृदय पिळवटून टाकणाऱ्या अनेक घटनांना स्पर्श केलेला आहे. स्वातंत्र्य पूर्व काळामध्ये स्वातंत्र्यासाठी, सुधारणेसाठी, अनेक स्तरावरील प्रश्नांसाठी अनेक प्रकारे संघर्ष झाले, आवाज उठवले गेले. बंड केले गेले. त्याचप्रकारचे बंड पूर्वपरंपरांना धक्का देत. पण क्रांती आमुलाग्र बदल घडविते. बंड उठाव असतो तर क्रांती परिवर्तन करते. अशीच एक क्रांती गंगाधर पानतावणे यांनी आपल्या लेखनाद्वारे समाजापुढे आणली अणि ती म्हणजे बंगालच्या बुद्धदेव भट्टाचार्यांनी असच एक क्रांतीचं पाऊल टाकले आणि एक अमानवीयतेचा अस्त झाला.

भारत अमानुष परंपरांचा-पंथांचाच देश. त्यातूनच स्वामित्वाचा आणि दास्याच्या कल्पनाही रुजल्या आणि नकळत अहंकार आणि आगतिकता उदयाला आली आणि ती म्हणजे जगणं हेच

ज्यांचे अस्तित्व, त्यांना अक्षरांची ओळख झाली काय नि न झाली काय ! यात त्यांना स्वारस्य राहिले नाही. दारिद्रयाचे, अज्ञानाचे बळी ठरलेले लोक जगण्यासाठी मरतात. तोच त्यांचा आक्रोश आणि हे लोक म्हणजे कोलकत्त्यातील पायी रिक्षा ओढणारी माणसं ? आपल्या कुटुंबाचे पोट भरण्यासाठी कशी ती आगतिकपणे माणसांची, बायाबापड्यांची वाट पहायची आणि त्याशिवाय घरची चूल पेटणार नाही. त्यांच्या वेदना गंगाधर पानतावणे यांनी अगदी पदोपदी व्यक्त केल्या आहेत.

त्यांचे गदगदणारं दु:ख व्यक्त करताना ते लिहितात, 'रिक्षावाल्याचे बोलणे सांगताना ते म्हणतात 'कोथे जाबे ?' अशा चौकशीला कधी सौम्यपणे तर कधी मग्रूरीनं उत्तर, 'किती घेणार?' या प्रश्नाला माफक उत्तर आठ टक्क्यावरुन पाच टक्क्यांवर नि सहा टक्क्यांहून तीन टक्क्यांवर येताना घासाघिशीबरोबर वेदनाही. पण त्याला इलाज नसायचा. रिक्षात कोण बसणाराय याची चौकशी नाही की तक्रार नाही. गलेलठ्ठ जोडपं असलं, तर विलक्षण धाप लागायची. रस्त्यावरुन अनवाणी पायानं माणसं ओढून नेताना डोळे, पाय, हात नि मन काबूत ठेवायचं. चुकून काही घडलं तर ? कुणाला धक्का लागला ? शिव्या आणि बेआदबी मिळायची म्हणून पाय आणि हात हेच ब्रेक. येणारे ग्राहक पैसे मोजतात म्हणून ही गुर्मी खाली मान घालून सहन करायची. आपल्या खांद्यांवर आपल्या कुटुंबाचे ओझे वाहणारे हे लोक कैकदा यायचे. पण करणार काय ? पण याच रिक्षवाल्याला एका माणसाने पैसे देऊ केले तर तो म्हणाला, "साहेब, मी रिक्षावाला आहे. भिकारी नाही .रिक्षात बसा. जिथं जायचं तिथं पोचवीन. मग पैसे द्या." हे रिक्षावाले गरिबीने आणि अनेक रोगाने पछाडलले होते.

बंगालने अनेक साम्यवाद्यांच्या सत्तेला आव्हान दिले. पण या रिक्षा चालकांच्या वेदना कुणालाच जाणवल्या नाहीत. त्या या बुद्धदेव भट्टाचार्य यांना जाणवल्या आणि त्यांनी हातावरील रिक्षा बंद केल्या. पण हजारो रिक्षा चालकांच्या भवितव्याचा प्रश्न होता. त्यासाठी त्यांनी आर्थिक तरतूद केली. ते म्हणाले यांना प्रशिक्षण द्यावे लगेल, तर नव्या स्वयंचलित रिक्षा आणाव्या लागतील आणि म्हणूनच गंगाधर पानतावणे म्हणतात, 'नव्या स्वयंचलित रिक्षा आणाव्या लागतील. अमानवीयता अस्ताला जाईल. त्यास काही काळ लागणारच !' खर तर खूप उशीर झाला. परंतु 'सुबह का भूला श्याम को लौटा, तो उसे भूला हुआ नहीं कहते.' पण पुन्हा एक चांगली सकाळ कोलकत्त्यात उगवली आणि अशा तऱ्हने त्यांची दयनीय अवस्था संपवून चांगली स्वप्ने त्यांनी रंगवायला सुरुवात केली.

## 'अर्थ आणि अन्वयार्थ' ग्रंथातील भाषाशैली आणि संवादशैली

गंगाधर पानतावणे यांनी 'अर्थ आणि अन्वयार्थ' या ग्रंथामध्ये आपल्या स्तंभलेखनाद्वारे लोकांना, समाजाला अंतर्मुख करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी समाजातील विदारक घटना, व्यक्तिचित्रणे, स्त्रियांविषयी प्रश्न, वाङ्मयीन प्रश्न, राजकीय प्रश्न, अनेक घटना यांना साध्या सरळ आणि सोप्या भाषेत मांडले आहे. यासाठी त्यांनी कठोर भाषेचा थोडासुद्धा उपयोग न करता आपले मत त्यांनी ठामपणे मांडलेले आपल्याला दिसून येते. अनेक घटनांमधील खऱ्या खोट्याचं अंतकरण तत्त्वचिंतना-दूवारे, सुभाषितशैलीद्वारे, लोकांच्या भाषेत, भावनेच्या भाषेत अशा विविध प्रकारे त्यांनी अक्षरांचा आणि शब्दांचा साधा आणि सरळ उपयोग केला आहे.

गंगाधर पानतावणे यांनी 'दै. लोकसत्ता' औरंगाबाद यामध्ये जे स्तंभलेखन केले यामध्ये त्यांनी सर्व विषयांना स्पर्श केलेल्या आहे. यामध्ये त्यांनी सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, वाङ्मयीन, स्त्रीविषयक, धार्मिक, शैक्षणिक, क्रीडा या विविध क्षेत्रातील सर्व घटकांना त्यांनी स्पर्श केलेला आहे. त्यांनी जे लेख लिहिलेले आहेत. या लेखांचे शीर्षक वाचल्यावरच ते एवढे समर्पक वाटतात की त्यावरूनच त्यांची भाषाशैली आणि संवादशैली लक्षात येते.

गंगाधर पानतावणे यांनी कवीचा मृत्यू या लेखामध्ये कवी निरंजन उजगरे यांची मृत्यूनंतर काढलेली आठवण आहे. त्यांच्याविषयी काढलेले उद्‌गार खरोखरच समर्पक असे लोकांच्या मनापर्यंत पोहचतील अशी त्यांची कविता येथे दिली आहे. यावेळी ते म्हणतात, ''निरंजन उजगरे यांची कविता काळजाला हात घालणारी अशी आहे. माणसाचं चिंतन करणारी, मानवाला आवाहन करणारी. निरंजन आता पुन्हा अशी कविता लिहायला नाही. ही व्यथा चिरंतन आहे. अनेक व्यवधानं सांभाळणारा, लोकजीवनाची नाळ सतत साधणारा कवी जगाच्या पडद्याआड जातो, तेव्हा कोण हे दु:ख लपविणार नाही? निरंजनाच्या अंत्यसंस्काराच्या वेळी दु:खानं गदगदून गेलेल्या त्यांची पत्नी अनुपमान आपल्या स्मृति शेष-पतीच्या आठवणीसाठी त्यांचीच एक कविता कवी सौमित्राला सादर करायला सांगितली श्रद्धांजली म्हणून,

**सावल्यांच्या प्रदेशाची**
**चाहूल लागेल ना**
**तेव्हा तुमच्या कविता घेऊन**
**माझ्याभोवती जमा व्हायचं**

**आणि मला कवित ऐकवीत राहायचं**
**नंतर अर्थबोध होणार नाही म्हणून**
**आताच सांगून ठेवतो माझे डोळे मिटलेले असतील**
**माझा श्वास मंदावलेला असेल**
**तुमच्या ओळी माझ्यापर्यंत पोचणार नाहीत,**
**असं तुम्हाला वाटेल, पण मित्रांनो,**
**कृपा करुन थांबू नका**
**खात्री बाळगा तुमच्या एका एका कवितेचा**
**काजवा मुठीत धरून मी प्रवास करीत असेन तेव्हा**
**सावल्यांच्या प्रदेशाचे एक एक अरण्य**
**गळून पडायचे तेव्हा पडतीलच**
**मुठीमध्ये धरून ठेवलेले काजवे**
**पण तिथपर्यंत**
**तुम्ही माझ्याबरोबर आहात**
**हा किती मोठा दिलासा ....**

अशाप्रकारे गंगाधर पानतावणे यांनी अगदी मोजक्या शब्दांत ती व्यक्तीच वाचकांच्या समोर उभी केली आहे असे वाटते. अशाप्रकारे निरंजन उजगरे यांचे व्यक्तिचित्रण उभे केले आहे. गंगाधर पानतावणे यांना जे काय सांगायचे ते मोजक्या शब्दात सांगितलेले आहे. उदा. 'हे चित्र ! आणि ते चित्र !!' या लेखामध्ये त्यांनी तीन घटना सांगून त्यांचा एकमेकांशी असलेला संबंध त्यांचा एकमेकांशी असलेला अर्थ आणि अन्वयार्थ लावला आहे आणि खालील वाक्यातून त्यांची वाक्यरचना आणि संवादशैली ही लक्षात येते. 'श्यामच्या आई'ला राष्ट्रपतींचे सुवर्णपदक मिळाले तेव्हा मराठी माणसांच्या आनंदाला उधाण आलं होतं. महाराष्ट्राची मान उंचावली होती. अटकेपार झेंडा रोवणाऱ्या मराठी माणसांचा हा गौरव होता. त्यावेळी छाती रुंदावून अत्र्यांनी म्हटले असेल, 'गेल्या दहा वर्षात असा पराक्रम झाला नाही.' भारतीय चित्रपट सृष्टीनं पुन्हा एका मराठी चित्रपटसृष्टीला अभिवादन केलं. 'श्वास' ला किती एक वर्षांनी राष्ट्रपतींचे सुवर्णपदक मिळाले. आचार्य असते तर त्यांनी ललकारी दिली असती, 'गेल्या दहा वर्षात असा बोलपट झाला नाही !'

आचार्य अत्रे यांचे कर्तृत्व अफाट आणि बोलणेही अफाट ! ते शब्दांचे स्वामी होते आणि अंत:करण उदार होते. कृपणता हा शब्द त्यांच्या कोशातच नव्हता. वनमालाबाईंची सात्विक आई कोण विसरणार ? आणि माधव वझे यांचा लहानगा श्याम. त्यांच्या स्वाभाविक अभिनयानं मराठी माणूस हरखून गेला होता. 'श्वास' मधले आजोबा आणि त्यांच्या लहानगा नातूही कधी तरी विसरता येईल का ? 'श्वास' च्या कथेनं तर काळजालाच हात घातला. 'ऑस्कर' ला नामांकन झालं. जगाच्या नकाशावर 'श्वास' न पाऊल ठेवलं. महाराष्ट्रानं आनंदोत्सव केला.''

वरील उदाहरणावरूनच लक्षात येते की 'अर्थ आणि अन्वयार्थ' ग्रंथामधील संवादशैली आणि भाषाशैली सामान्य लोकांच्यापर्यंत पोहचणारी आहे. गंगाधर पानतावणे यांनी वेळोवेळी ज्याविषयी लेखन केले आहे त्याविषयीची वेगवेगळी उदाहरणे देऊन लोकांना ते पटवून सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

'त्यापेक्षा मरण आलले बरे !' या लेखामध्ये त्यांनी भारतामध्ये एक चांगली राज्यघटना असताना देखील मोकळीक मिळालेल्या लोकशाहीमुळे, खाजगीकरण, उदारीणकर, जागतिकीकरण त्यामुळे राज्यघटना मलिन झाली. मग या भारताचं कसं होणार ? राजकारणानं देशाचं काय होणार आणि मग संचित विजय तेंडुलकरांना वाटलं भारताचं कसं होणार ? म्हणूनच ते म्हणाले, 'राज्यघटनेचाच पुनर्विचार करण्याची वेळ आली आहे. याविषयी ''राष्ट्रपती के. आर. नारायण म्हणाले होते, भारतीय राज्यघटना की काळाच्या कसोटीवर उतरली आहे. त्यामुळे घटनेचा फेरविचार करण्यापूर्वी घटना यशस्वी ठरली आहे की नाही ? का ती राबवण्यात आपण अयशस्वी ठरलो. याच परीक्षण करायला हवं आणि म्हणूनच गंगाधर पानतावणे म्हणतात, अध्यक्षीय शासनप्रणाली अस्तित्वात आणण्याच्या आग्रहापोटी, राज्यघटनाच बदलून टाकण्याची भाषा कशासाठी ? अमेरिकेकडे तोंड करून एकतंत्री राज्य उपभोगण्यासाठी ? हिंदू राष्ट्रवाद जोपासण्यासाठी ? हिंदू मतपेटी भक्कम करण्यासाठी ? मूलतत्त्ववाद आणि धार्मिक उन्मादाला गोंजारण्यासाठी ?

तेंडुलकर राज्यघटनेचा पुनर्विचार व्हावा ही तुमची मागणी देशात बदल घडत नाही म्हणूनच ना ? ही अवस्था संवेदनशील मनाची की राज्यघटनेलाच सुरुंग लावून एकाधिकारशाही प्रस्थापित करण्याची आकांक्षा बाळगणाऱ्या उजव्या राजकारण्यांची ? असा सरळ प्रश्न सुद्धा त्यांनी तेंडुलकरांना केला आहे. असे सरळ सरळ जे काही मनाला भावले, पटले, रुचले ते वाचकांसमोर मांडण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे.

आपल्या लेखनाद्वारे विस्मरण झालेल्या अनेक गोष्टींचे, घटनांचे, व्यक्तींचे त्यांनी स्मरण करून देण्याचे काम 'अर्थ आणि अन्वयार्थ' ग्रंथाद्वारे केले आहे. यामध्ये त्यांनी 'सूर्यकुलातील कवीचा गौरव' या लेखामध्ये त्यांनी केशवसुत, मर्ढेकर, सुर्वे यांची आठवण करून दिलेली आहे. त्याचप्रमाणे त्यांनी नारायण सुर्वे यांची काव्यक्रांती सांगितलेली आहे. त्यांच्या 'माझे विद्यापीठ' यामधील कामगारांच वर्णन त्यांनी यामध्ये केले आहे. अगदी समर्पक शब्दात त्यांनी त्यांच्या कवितेचे वर्णन केले आहे.

ते सांगतात सुर्व्यांच्या काही कवितांची मुळे अभ्यासकांनी उर्दू गझलांमध्ये शोधली, काहींनी रशियन कवितेमध्ये शोधली. पण त्यामुळे त्यांच्या कवितेचे तेज मंदावलं नाही. त्यांचे वेगळेपण नाकारताच येत नाही. त्यांचा आत्मविश्वास न्याराच आहे.

**एकटाच आलो नाही, युगाची साथ आहे**
**सावध असा तुफानाची हीच सुरुवात आहे**
**कामगार आहे मी तळपती तलवार आहे**

आणि म्हणूनच त्यांच्या विषयी गंगाधर पानतावणे म्हणतात, ''या तळपत्या तलवारीचं पाणी गोदाकाठच्या 'जनस्थान पुरस्कारा'नही हेरलं. नारायण सुर्वे नावाच्या ज्येष्ठ मराठी कवीचा गौरव केला. खरं तर हा 'जनस्थान पुरस्कारा'चाच गौरव म्हणायचा !

गंगाधर पानतावणे यांचे शब्दभांडार एवढे मोठे आहे की दोन घटनांचा संदर्भ ते अगदी सहजपणे लावतात. एका वेगळ्या घटनेच्या उदाहरणावरुन ते दुसऱ्या घटनेपर्यंत ते आपल्या शब्दाद्वारे कसे घेऊन जातात आणि दोन्हीचा अन्वयार्थ ज्याप्रमाणे लावतात ते आपल्या लक्षात येत नाही. हे त्यांच्या 'मी जिंकलो ! मी हरलो !' या लेखाद्वारे लक्षात येते. त्यामध्ये त्यांनी निवडणुकीच्या काळामध्ये निवडणुकीत उभे राहणारे लोक त्यांचा गोंधळ, प्रचार-प्रसार याचे वर्णन केले आहे. ते म्हणतात, ''पावसाळा आला की, माणसं बरीचशी सावध होतात. ग्रीष्माच्या तडाख्यानं बेजार झाल्यास थोडासा थंडावा मिळेल म्हणून बरं वाटतं. पण छत्र्या शोधाव्या लागतात. दुरुस्त करून घ्याव्या लागतात. कौलारु घर असलं तर पुन: शाकारावं लागतं. डागडुजी करावी लागते. घर गळू नये म्हणून काळजी घ्यावी लागते. निवडणुकांचंही तसच आहे. निवडणूक ज्वर काही आगळाच. तो कुणाला केव्हा येईल नेम नाही.

गंगाधर पानतावणे यांनी अनेक घटनांचा परामर्श अगदी संवेदनशीलपणे घेतला आहे. यासाठी त्यांनी अनेक ठिकाणी आपले म्हणणे पटवून देण्यासाठी वेदांचा, पौराणिक ग्रंथांचा, संस्कृत सुभाषितांचा वापर केला आहे. 'सामाजिक पारतंत्र्याचा जाहिरनामा' या लेखामध्ये त्यांनी म्हटले आहे की देशाला स्वातंत्र्य मिळवून अठ्ठावन्न वर्षे पूर्ण झाली. आपले राजकीय स्वातंत्र्य प्रौढ झालं. परंतु आपले सामाजिक प्रश्न अजूनही आहेत तिथंच आहेत. त्यांची शैशवावस्था आहे तशीच आहे. यामध्ये त्यांनी त्यावेळची दलितांची अवस्था, स्पृश्य-अस्पृश्य, शुद्रातिशुद्र असा भेदभाव फार मोठ्या प्रमाणात होता. वाल्मिकी समाजातील दलितांवर होणारा अन्याय स्पष्ट करताना त्यांनी मनुस्मृतीतील उदाहरण देऊन त्यामध्ये शूद्रांनी केवळ ब्राह्मणांची सेवा करावी हे स्पष्ट करताना ते उदाहरण देतात.

**चण्डालश्वपचानां तु बहिर्ग्रामात्प्रतिमयः।**
**अपापात्राश्य कर्तव्या धनमेषा श्वगर्दभम्।।**
**वासांसि मृतचेलानि भिन्नभाण्डेषु भोजनम्।**
**कार्ष्णाय समलंकार परिव्रज्या च्य नित्यशंः।।**

याचा अर्थ - अस्पृष्यांनी गावाबाहेर घर बांधून रहावं. कुत्री आणि गाढव हेच त्यांचे धन. त्यांनी मेलेल्या माणसांची वस्त्रे वापरावीत. फुटलेल्या भांड्यात जेवावे. लोखंडाचे दागिने आणि कंकण वापरावीत. हजार वर्षापूर्वी मनुने नाकारलेल्या माणसांना दिलेली शिक्षा एकविसाव्या शतकात ही सुरू आहे. शुद्रांनी, अस्पृश्यांनी निर्धनच असायला हवे. शुद्रांनी धन कमवलंच तर त्यावर स्वामित्व ब्राह्मणाचंच . त्यांना किंचितही अधिकार नाही.

अशाप्रकारे त्यांनी ग्रंथाद्वारे दलित लोकांची जी दयनीय अवस्था होती याचे चित्रण अगदी यथार्थपणे केले आहे. दलितांची ही जी अवस्था केली होती याविषयी त्यांची शब्दरचना आणि भाषाशैली संवेदनशील अशी आहे. उदा.

''हरयाणा मधील जाट मनूधर्म पाळताहेत. मनूची आज्ञा प्रमाण मानताहेत. त्यात त्यांची चूक कसली ? दलितांनी कसं 'जोहार' घालत जगावं. पायरी ओलांडू नये. नाही तर आम्ही तुमची राखरांगोळी करुन टाकू ! गोहानाचा विध्वंस जातीच्या अभिनाचा विध्वंस होता. निष्पाप नि निरागस माणसांची घर जाळणं हा वटलेल्या मूलतत्त्ववादाचा पुनरुज्जीवनवादाचा आणि सनातनत्वाचा विजय होता. मानवतावादाला, संविधानाला न जुमानणारं औधत्य, आणि अहंकार होता. 'अवघे विश्वचि माझे घर' या उदात्त तत्त्वज्ञानाचा मुखवटा होता.''

वरील उदाहरणावरूनच आपल्या लक्षात येते की दलित अस्पृश्य लोकांची जी जीवघेणी अवस्था ब्राह्मण व्यवस्थेनी करून ठेवली होती ती खरोखरच करुणास्पद होती. त्यांची ही अवस्था गंगाधर पानतावणे यांनी वेळोवेळी उदाहरणे देऊन स्पष्ट करून सांगितली आहे.

गंगाधर पानतावणे यांनी प्रत्येक स्तरातील व्यक्तीचे व्यक्तीचित्रण करून त्यांच्या आठवणी कायम आपल्या ग्रंथाद्वारे ठेवल्या आहेत. यामध्येच त्यांनी एका स्त्री लावणीकार कलावंताचे दु:ख आपल्या ग्रंथाद्वारे मांडलेले आहे. तेव्हा ते रोशन सातारकर यांच्या विषयी म्हणतात -

‘‘कलावंताच्या मृत्यूचं दु:ख क्षणकाल नसतं. ते खूप काळ मनात रुंजी घालत राहतं. मग तो मृत्यू शब्दांची साधना करणाऱ्या निर्मात्यांचा असो नाही तर स्वरांची साधना करणाऱ्या गानतपस्व्यांचा असो. त्यांच आपल स्वत:च असे युगच होतं. आपल अवघं आयुष्य लावण्यांच्या नजराणा पेश करण्यात उधळून टाकणारी रोशन, लावणीला प्रतिष्ठा देऊन गेली. असं म्हणतात की, फडात अडकलेली लावणी तिनं माजघरात आणली. लावणीला नाकं मुरडणाऱ्या सभ्य माणसांच्या असभ्य अभिरुचीला वेसण घातली. आज हे लावण्य काळाच्या पडद्याआड गेले नाहीतर मराठी मुलखानं लावणीकारांना नि लावणी पेश करणाऱ्यांना भरभरुन दाद कधी दिली ! म्हणूनच कवी बी खंत व्यक्त करतात

**उणीव रसिकांची परि। आज भासते खरोखरी**

गंगाधर पानतावणे यांनी आपल्या ग्रंथामध्ये प्रत्येक शब्द विचार करून तोलून मापून मांडलेला आपणास दिसतो. यामध्ये त्यांनी समाजमनाचा, लोकांच्या मनाचा विचार करून विविध घटनांचे वर्णन त्यांनी आपल्या शब्द शैलीमध्ये केलेले आहे. यामध्ये त्यांनी विविध घटनेद्वारे परखड असे टीकास्त्र उचललेले आहे. पण ते योग्य अशा भाषाशैलीमध्ये केलेले आपणास दिसून येते.

लावणीला वाईट म्हणाणाऱ्या टीकाकारांविषयी ते सहज म्हणींचा वापर करून जातात. ते त्यांच्याविषयी ‘वरून किर्तन आतून तमाशा’ असा सहज म्हणींचा वापर करून ते पटवून देण्याचा प्रयत्न करतात.

ते एखादा मुद्दा सहज पटवून सांगण्याचा प्रयत्न करतात. यामध्ये ते म्हणतात लावणीकारांच्या उत्तान शृंगारावर शब्दांच्या तलवारीने घाव घालणाऱ्या काही समीक्षकांनी लावणीकारांच्या जीवनाचं काही एक तत्त्वज्ञान मांडणाऱ्या लोकस्थितीचं आणि समाजमनाचं दर्शन घडविणाऱ्या लावण्यांकडं हेतुत: दुर्लक्ष केले असेल लावणीकार विलासी मनोवृत्तीचं, माणसाच्या रंगढंगाचं शब्दांकन करतो;

तो कामुकतेचा नि अनैतिकतेचा प्रचारक किंवा पुरस्कर्ता नसतो. अगदी हेच माप लावणी गाणाऱ्यांच्या पदरात घालावं लागतं. उत्कट शृंगाराची लावणी गायली की त्या कलावंताच्या आयुष्याशी त्याची नाळ बांधणं क्रुरता होईल. सुलोचनाबाई चव्हाण, यमुनाबाई वीरकर, रोशनबाई सातारकर यांच्या शृंगार लावण्या ऐकून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाशी त्यांचे कोणी नातं जोडलं तर यापेक्षा अभिरूचीहीनता कोणती नि अधमपणा कोणता ?

अशाप्रकारे त्यांनी कलावंताचे दु:ख ही मांडण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच त्यांनी आपल्या लेखन शैलीत अनेक कवितांच्या ओळींचा, अनेक गाण्यांच्या ओळी घेऊन आपले विचार पटवून देण्याचा प्रयत्न आपणास दिसून येतो आणि समर्पक ओळींचा वापर केलेला आपणास दिसून येतो की तो मुद्दा सहज आपल्या लक्षात येतो. निरागस लहान मुलांना म्हणजेच विद्यार्थ्यांना झालेल्या यातनांच्या दु:खाचं वर्णन त्यांनी केले आहे.

**जे रम्य ते बघुनिया मज वेड लागे**
**गाणे मनात मग होई सेवेचि जागे ।।**

अशा निर्मळ अभिव्यक्ती करणाऱ्या, गुलाबाची कळी पाहून हरवून गेलेल्या एवढंच नाही तर फुलांची पाखरण पाहून

**टिप फुले टिप । माझे गडे गा ।**
**टिप फुले टिप । पहा फुलांची पाखरण झिप ।।**

म्हणून आनंदून गेलेल्या आणि सुंदर सकाळ पाहून 'किती सकाळ ही सुंदर ... जसे मुलींचे माहेर' अशी भावसुंदरता व्यक्त करणाऱ्या केशवसुतांनी समाजातील दृष्ट वृत्तीवरही तितकेच दृष्ट प्रहार केले आहेत. नियम माणसांकरिता असतात. माणूस नियमांसाठी नसतो. नियमांना बंधनांचे स्वरूप असेल आणि ते गतिरोधक ठरत असतील तर ते झुगारूनच द्यायला हवेत. असा निर्घुणतेवर आसूड ओढणारा विचार केशवसुतांनी सांगावा आणि यापेक्षा शाळेत शिकणाऱ्या लहान मुलांची छळवणूक करणाऱ्यांचा त्यांना संताप होतो. क्षोभ अनावर होतो. 'मुलास झोडपणाऱ्या पंतोजीस' या कवितेत तर त्यांनी शिक्षकाचा निषेधच केला आहे. आणि ते कठोरपणे म्हणाले, 'क्रुरा ! खाटिक कां न जाहलास ?' असा संताप त्यांनी व्यक्त केला आहे. अशीच अवस्था झालेल्या विद्यार्थ्यांचे दु:ख गंगाधर पानतावणे यांनी मांडलेले आहे.

गंगाधर पानतावणे यांनी 'जळो जिणे लाजिरवाणे !' या लेखामध्ये रामचंद्र भट महाराज, तोडकर महाराज, गोपाळगीर महाराज अशा अनेक भोंदू महाराजांनी आपल्या सेवकसदनामध्ये अनेक स्त्रियांचे लैंगिक शोषण केलेले होते. त्यांचा विनयभंग केलेला होता. या भोंदू महाराजांनी अनेकांना फसवले होते. अनेकांना लुटले होते. पण या सर्व प्रकाराला एक स्त्रीने वाचा फोडली. सर्व प्रकार उघडकीस आणला. या विषयी गंगाधर पानतावणे म्हणतात, ''समाजाच्या नीतिमत्तेला केवढे हादरे बसतात. केवढे सुरूंग लावले जातात. एक परंपराच आहे. महाराजांच्या मठाची महाराष्ट्रात!'' केवढा संताप व्यक्त केला होता नामदेवांनी, तुकारामांनी आणि रामदासांनीसुद्धा ! सामाजिक अध:पतनाची त्यांना घृणा होती. कोवळी जनाबाईसुद्धा कर्मभ्रष्ट आणि ज्ञानभ्रष्ट महाराजांविषयी अत्यंत कडवेपणाने व्यक्त झाली होती. तुकाराम म्हणाले होते,

**होऊन संन्यासी भगवी लुगडी।**
**वासना न सोडी विषयांची॥**
**लांबवोनी जटा नेसोनि कासोटा ।**
**अभिमान मोठा धरताती ॥**
**शाक्त गधडा जाये देशी।**
**तेथे राशी पापांच्या ॥**

अनाचारांनी तुकाराम व्यथित होत. कष्टी होत. आचारभ्रष्ट, दांभिक आणि दुर्जनांची संभावना ते कठोरपणे करीत. त्यांच आंतरिक दु:ख व्यक्त करताना ते म्हणत ...

**बुडती हे जन न देखवे डोळा।**
**येतो कळवळा म्हणुनिया ॥**

वरील उदाहरणावरून लक्षात येते की संत महात्म्यांची परंपरा लाभलेल्या या महाराष्ट्रात असे निष्कर्म भोंदू महाराज स्वत: महात्मे म्हणवून घेणाऱ्या लोकांचा त्यांच्या वागणूकीचा योग्य अशा शब्दशैलीमध्ये आणि योग्य अशा उदाहरणावरून गंगाधर पानतावणे यांनी योग्य प्रकारे अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न केला आहे.

गंगाधर पानतावणे यांचा अभ्यास हा एवढा गाढा अभ्यास आहे हे त्यांच्या भाषाशैलीद्वारे, संवादशैली आणि शब्दशैलीवरून आपल्या लक्षात येते. त्यांनी 'अर्थ आणि अन्वयार्थ' या ग्रंथामध्ये जे लेखन केलेले आहे ते खरोखरख समाजमनाचा आणि लोकमनाचा विचार करून केले आहे.

कारण त्यांनी जे स्तंभलेखन केले आहे त्यामध्ये स्तंभातून दंभाचा स्फोट होतो आणि समाज स्तंभित होतो. त्यामुळे त्यांनी योग्य अशा शैलीमध्ये लेखन केले आहे. त्यांनी आपल्या विविध लेखामध्ये विविध घटनांचा जो वेध घेतला आहे. यामध्ये प्रत्येक घटना पटवून सांगण्यासाठी त्यांनी विविध उदाहरणे दिली आहेत, त्यामुळे समाजामधील लोकांना नवीन दृष्टी मिळते. समाजामध्ये सुधारणा घडवून आणणाऱ्या आहेत. या ग्रंथामधील लेखन समाजातील लोकांच्या मनाला स्पर्श करून जाते. त्यामुळेच स्तंभलेखनाची कामगिरी मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. स्तंभलेखनाच्या प्रसिद्धीचा वेग वाढलेला आहे. अर्थ आणि अन्वयार्थ या ग्रंथातील उत्कृष्ट अशा लेखन शैलीमुळे हा ग्रंथ प्रसिद्धीस पावलेला आहे.

गंगाधर पानतावणे यांच्या 'अर्थ आणि अन्वयार्थ' या ग्रंथाचा सामाजिक आणि वाङ्मयीन दृष्ट्या विचार जो या ठिकाणी मांडलेला आहे, तो विचार करणे खूप गरजेचे आहे. कारण या ग्रंथामध्ये सामाजिक आणि वाङ्मयीन जे लेखन केले गेले आहे ते खरोखरच महत्त्वपूर्ण असे लेखन आहे. आणि म्हणूनच स्तंभलेखन हा वाङ्मयीन रचना प्रकार वाटतो. त्यांच्या प्रत्येक लेखामध्ये समाजातील प्रत्येक घटकांचा, दुःखाचा, आनंदाचा वेध घेतलेला आपणास दिसून येतो.

या ग्रंथामध्ये अस्पृश्य, दीन, दलित, बालक, स्त्रिया, राजकीयता, शैक्षणिक, धार्मिक, वाङ्मयीन, अनेक नामवंत व्यक्ती, अनेक कालबाह्य घटना या सर्व घटनांना त्यांनी स्पर्श केलेला दिसून येतो. अगदी महत्त्वपूर्ण असे नाही तर तळागाळातल्या दुःखांना त्यांनी स्पर्श केला व स्तंभलेखनाद्वारे समाजापुढे आणण्याची वाट मोकळी केलेली आपणास दिसून येते. आणि या सर्व घटना समाजापुढे मांडत असताना ललित शैलीने जे त्यांनी लेखन केले आणि लालित्यमय विचार प्रकटीकरणाला फार मोठ्या प्रमाणात महत्त्व दिले आहे. त्यामुळे या ग्रंथाचा वाङ्मयीन दृष्ट्याविचार मोठ्या प्रमाणात केला आहे.

अनेक लेखकांनी केलेल्या स्तंभलेखनावरून आणि स्तंभलेखनाच्या वैशिष्ट्यावरून या 'अर्थ आणि अन्वयार्थ' ग्रंथातील विविध प्रकारचे प्रसंग, वेगवेगळ्या प्रकारचे चित्रण, भाषाशैली, ललित शैली, या सर्वांचा विचार करता गंगाधर पानतावणे यांचा 'अर्थ आणि अन्वयार्थ' हा ग्रंथ खरोखर महत्त्वपूर्ण असा आहे आणि म्हणून या ग्रंथाद्वारे आणि विविध प्रकारच्या स्तंभलेखनाद्वारे स्तंभलेखनाला वाङ्मयीन दर्जा मिळणे महत्त्वपूर्ण ठरते. या दृष्टीने या प्रकरणात विचार मांडला गेला आहे. त्याचबरोबर गंगाधर पानतावणे यांचे चित्रण ही उत्कृष्ट स्वरूपाचे असे आहे. म्हणूनच स्तंभ-लेखनामध्ये 'अर्थ आणि अन्वयार्थ' हा ग्रंथ वाङ्मयीन आणि सामाजिकदृष्टया महत्त्वपूर्ण आहे.

## निष्कर्ष

१. गंगाधर पानतावणे यांनी आपल्या 'अर्थ आणि अन्वयार्थ' ग्रंथातून सामाजिक जीवनातील द्वंद्व, माणसाच्या वागण्यातील ढोंगीपणा याचा वेध आपल्या लेखातून घेतला आहे.

२. सामाजिक प्रश्नांची जाणीव पानतावणेंच्या ग्रंथातून तीव्रतेने जाणवते.

३. रा. ग. जाधव यांच्याघरावरील लेख 'घर देता का घर?', 'सूर्यकुलातील कवीचा गौरव', 'कवीचा मृत्यू' अशा काही लेखातून वाङ्मयीन विषयावरचे लेखन पानतावणे यांनी केले आहे.

४. व्यक्तिचित्रण करताना पानतावणेंच्यात दडलेला संवेदनशील, सहृदयी माणूस आपल्याला दिसतो.

५. 'अर्थ आणि अन्वयार्थ' या ग्रंथातील काही लेखांवरुन लेखकाचा राजकीय प्रश्नांचा अभ्यास आणि ते मांडण्याची हलकी फुलकी विनोदी शैली स्पष्टपणे दिसते.

६. समाजात दिसणारा ढोंगी-पाखंडीपणा यावर पानतावणे यांनी परखड शब्दात हल्ला चढवला आहे.

७. दलित पुरोगामी चळवळ आणि आंबेडकरवादावरील निष्ठा त्यांच्या प्रत्येक लेखातून प्रत्यक्ष अप्रत्यक्ष व्यक्त होते.

८. विस्तीर्ण जीवनदृष्टी, थेटपणा, विरहितता आणि प्रामाणिकपणा ही त्यांच्या लेखनाची खास वैशिष्ट्ये आहेत.

९. साधी, सोपी भाषा, थेट वाचकांशी संवाद साधणे, सुसंस्कृत भाषा, लालित्यपूर्ण भाषेत केलेले लेखन ही पानतावणे यांची खासियत आहे.

१०. त्यांची भाषाशैली, सुभाषित शैली, लेखनशैली, वाक्यरचना हे सर्व त्यांच्या लेखातून स्पष्टपणे दिसून येतात.

११. गंगाधर पानतावणे यांची शब्दयोजना, भाषायोजना, वाक्ययोजना संपूर्ण लेखात लालित्यपूर्ण अशी आहे.

## संदर्भ


१. जाधव, मनोहर (२००६), 'डॉ. गंगाधर पानतावणे यांचा साहित्यविचार', 'साहित्य, समाज आणि संस्कृती' (संपा. जाधव, मनोहर, देशमुख, केशव, कांबळे, ऋषीकेश) सुविधा प्रकाशन, पुणे.

२. फडके, भालचंद्र (१९७७), 'दलित साहित्य - वेदना व विद्रोह', श्री विद्या प्रकाशन, पुणे, ३०.

३. मनोहर, यशवंत (१९७८), 'दलित साहित्य : सिद्धांत आणि स्वरूप', औरंगाबाद.

४. सबनीस, श्रीपाल, (२००६), महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासाचे 'पिंपळपान', 'साहित्य, समाज आणि संस्कृती', (संपा. जाधव, मनोहर, देशमुख, केशव, कांबळे, ऋषीकेश) सुविधा प्रकाशन, पुणे.

५. भोसले, द. ता. (१९८६), 'पार आणि शिवार', अ. वि. पारगावकर, प्रतिमा प्रकाशन, पुणे.


----x----